साईदरबारातील नवरत्ने — २

# परमसाईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर



श्री. नारायण गोविंद उर्फ नानासाहेब चांदोरकर हे श्री साईबाबांचे काळातले बाबांचे अतिशय लाडके असे परमभक्त होते. श्री बाबांचा त्यांचेवर वरदहस्त होता. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. २१ ऑगस्ट रोजी येणाऱ्या त्यांच्या ६५ व्या पुण्यतिथीनिमित्त नानांच्या संबंधीचा लेख प्रसिद्ध करून त्यांना आदरांजली वाहात आहोत.

— का. संपादक

# परम साईभक्त श्री. नानासाहेब चांदोरकर

साईबाबांचे अतिनिकटचे स्नेही व भक्त म्हणून श्री. नानासाहेब चांदोरकर यांचे नाव घेतले जाते. त्यांचे संपूर्ण नाव श्री. नारायण गोविंद चांदोरकर. त्यांचा जन्म ठाणे येथे शके १७८२ इ.स. १८६० च्या पौष महिन्यातील मकरसंक्रांतीच्या दिवशी झाला. त्यांचे मराठी शिक्षण कल्याण येथे व इंग्रजी शिक्षण मुंबईस एल्फिन्स्टन विद्यालयात व त्या पुढचे एल्फिन्स्टन महाविद्यालयात झाले. ते मुंबई विद्यापीठाचे बी.ए. पदवीधर. संस्कृत हा त्यांचा अतिशय आवडीचा विषय.

बी.ए. नंतर त्यांची नेमणूक प्रथम संगमनेर येथे मामलतदार कचेरीत कारकुनाचे जागेवर झाली. नंतर ते काही दिवसांनी नगर जिल्ह्यातील कोपरगावी अव्वल कारकून म्हणून नेमले गेले. १८९२ साली नगर येथे ते कलेक्टरसाहेबांचे चिटणीस झाले. पुढे १८९३ साली त्यांना पुणे जिल्ह्यात घोडनदी तालुक्याचे मामलतदार नेमण्यात आले. नंतर पुन्हा १८९४ ते १९०१ पर्यंत नगर जिल्ह्याच्या कलेक्टरसाहेबांचे चिटणीस नेमण्यात आले. १९०२ मध्ये त्यांना जामनेर तालुक्याचे मामलेदार नेमले गेले. नंतर त्यांची बदली अनुक्रमे नंदुरबार, पंढरपूर इ. ठिकाणी मामलतदार म्हणून करण्यात आली होती. १९०८ साली त्यांची बदली ठाणे येथे डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर म्हणून झाली व १९१५ साली ते डिस्ट्रिक्ट डेप्युटी कलेक्टर या पदावरूनच सेवानिवृत्त झाले.

श्री. नानासाहेब यांचा विवाह १८७८ साली कल्याण येथे झाला. अलिबाग जिल्ह्यातील पनवेल तालुक्यातील पळसपे गावातील प्रसिद्ध श्रीमान सावकार व जमीनदार ओझे घराण्यातील श्री. विनायक सदाशिव उर्फ काकासाहेब ओझे यांची कन्या बयाबाई यांच्याशी झाला. त्यांचे सासरचे नाव राधाबाई. नानांना बरीच अपत्ये झाली. पण अलीकडच्या काळापर्यंत चारच हयात होती. दोन चिरंजीव व दोन कन्यका. वडील चिरंजीव वासुदेव उर्फ बाबुराव बी.ए. असून ते विलेपारले येथील खाजगी आंग्ल विद्यालयात गणिताचे शिक्षक होते. धाकटे चिरंजीव महादेव उर्फ बापूराव पुणे येथील कृषिकर्म आंग्ल विद्यालयात शेतकीचे शिक्षण घेऊन घरची शेतीवाडी पहात असत. वासुदेवांचा विवाह ग्वाल्हेर येथील प्रसिद्ध जहागिरदार श्री. रामराव कृष्ण उर्फ काकासाहेब जठार यांची कन्या इंदिरा हिजबरोबर झाला होता व बाबुरावांचा विवाह धारवाड येथील वकील त्रिविक्रम काशिनाथ उर्फ तात्यासाहेब पित्रे यांची कन्या गिरीजाबाईशी झाला होता. वडील कन्यका सौ. मैनाबाई कुवळेकर या पुण्यास व धाकटी कन्या सौ. द्वारकाबाई पेंढारकर या सातारला दिल्या होत्या.

नानासाहेब कोपरगावी अव्वल कारकून असताना त्यांचा लहान मुलगा आजारी पडला. पण त्या वेळी तिथे रुग्णालय नसल्याने व वेळेवर औषधपाण्याची सोय न झाल्याने तो मरण पावला. औषधपाण्यावाचून येथल्या लोकांची बरीच गैरसोय होत असते, म्हणून की काय, नानांनी १८९० साली आपले स्वतःचे पैसे खर्च करून एक खाजगी रुग्णालय कोपरगावी काढले व ते १८ वर्षे चालवून पुढे लोकल बोर्डाच्या ताब्यात दिले.

## नानासाहेबांचे वडील

नानासाहेबांच्या वडलांचे नाव गोविंदपंत नाना उर्फ नानासाहेब असे होते. तेही डे. कलेक्टर होते. ते परसनल असिस्टंट होते. त्यावेळी त्यांना दप्तरदार ही पदवी होती. अद्यापही कल्याणास त्यांचे वाड्यास दप्तरदारांचा वाडा असे म्हणतात. ते फार सदाचारी, सत्त्वशील, व स्नानसंध्यादिकर्मनिष्ठ असत. त्यांचा रोजचा दानधर्म पुष्कळ असे.

## वडलांस संतानुग्रह

ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यातील कवाड क्षेत्र निवासी श्री समर्थ सद्गुरु सखाराम महाराज यांचे ते अनुग्रहीत होते. ते कवाडास नेहमी जात, व महाराजांची हरतऱ्हेची सेवा करीत. त्यांच्यावर महाराजांची कृपा असे. श्री. शंकरराव महाजनांचे सहवासाने ते महाराजांकडे जाऊ लागले. (आपटे कृत सखाराम म. चरित्र पान ९९).

पण नानासाहेब यांचे अंतःकरण ते नोकरीत असतानाच परमार्थाकडे वळून ते कवाडास श्री. सखाराम महाराज यांचेकडे न जाता शिरडीस बाबांकडे जाऊ लागले. हा तरी अनुवंशिक संस्कारच होय.

## बाबांचे आकर्षण

जरी नानासाहेबांचे वडिलांची सखाराम महाराजांवर अप्रतिम श्रद्धा व अलौकिक भक्ति होती तरी नानासाहेब हे सन् १८९२ सालापासून त्यांचे वडील हयात असतानाच बाबांकडे जाऊ लागले, नव्हे बाबांनीच त्यांना आपल्याकडे ओढले.

## नानासाहेब बाबांकडे येण्यापूर्वी मशिदीची व बाबांची स्थिती

जिकडे तिकडे खाच खळगे पडून ढोपर ढोपर कचरा साचलेल्या मोडक्या तोडक्या मशिदींत बसून रात्रंदिवस चिलीम फुंकणाऱ्या, गावात ३-४ विवक्षित घरी शिळ्या भाकरीचे तुकडे मागून खाणाऱ्या, अंगावर फाटके तुटके कपडे घालणाऱ्या फकिरास हे निर्गुण परमात्माचे सगुणावतार चिद्रत्न प्रतीक आहे असे कोण समजणार? आपल्यास लोकांनी मान द्यावा, किंवा ही एक अमुक विभूती आहे असे जगास ज्ञात व्हावे अशी ज्यांची इच्छाच नाही, कधी कधी गुप्त, तर कधी कधी कंटकमय बाभळीचे जंगलात वास करून वेड्याचे सोंग घेणाऱ्या फकिराकडे कोण येणार व त्यांचे सूक्ष्म निरीक्षण कोण करणार?

नानासाहेब शिरडीस बाबांकडे येण्यापूर्वी बाबा सिद्ध किंवा साधु पुरुष म्हणून कोणास माहीत नव्हते. गांवकरी व बाहेर गावचे लोकही त्यांना त्याप्रमाणे मानीत नसत. लोकांना दवा देणारा, धुनी पेटवून चिलीम फुंकणारा व मशिदींत बसून भीक मागून पोट भरणारा असा एक फकीर आहे यापेक्षा कोणासही त्यांच्या ऐश्वरी सामर्थ्याची जाणीव नव्हती.

फक्त श्री. गंगागीर बुवा व आनंदनाथ महाराज यांनी शिरडीस आल्यावेळी "अरे हा उकिरड्यावर पडलेला अमोल हिरा आहे व तुमच्या अद्वितीय भाग्याने तो तुम्हास लाभलेला आहे" असे मुक्त कंठाने लोकांना सांगितले होते. पण तिकडे लक्ष देतो कोण?

पुढे काही कालाने निमगांवचे नानासाहेब डेंगळे व निमोणचे नानासाहेब (देशपांडे) निमोणकर बाबांकडे येऊ जाऊ लागले.

## नानासाहेबापूर्वी सुशिक्षितांपैकी प्रथम कोण आले

सुशिक्षितांपैकी अगदी प्रथम कै. श्री. चिदंबरराव गाडगीळ, सिन्नरचे मामलेदार, रावसाहेब सीताराम विश्वनाथ पटवर्धन, बी.ए. शाळाखात्याचे मुख्याधिकारी व रावसाहेब वामनराव बोडस स्पेशल जज्ज. हे बाबांच्या दर्शनास आले होते.

श्री. चिदंबरराव गाडगीळ हे नगरास कलेक्टर साहेबांचे चिटणीस होते. त्यांची बदली पुढे मामलतदाराचे जागी झाली. व त्यांच्या चिटणिसीचे जागेवर नानासाहेब चांदोरकर नगरास आले.

## संत समागम परिणाम

नानासाहेब आपले वडिलांबरोबर लहानपणी कधी कधी कवाडास सखाराम महाराजांकडे जात असत. नोकरी लागल्यापासून मात्र ते तिकडे फारसे गेले नाहीत. आंग्ल विद्यादीप्तीने डोळे दिपून गेल्यामुळे पदवीधर सुशिक्षितांच्या मनाचा कल संताकडे कमीच. तथापि वडिलांच्या संगतीने संतसमागमाचा प्रभावशाली परिणाम नानासाहेबांचे मनावर झाल्याखेरीज राहिला नाही.

तालुक्याची जमाबंदी करण्याचे काम एकसाल प्रांताधिकारी यांजकडे व एकसाल जिल्हाधिकारी यांजकडे असते. नानासाहेब चिटणीसीचे कामावर असता कोपरगाव तालुक्याची जमाबंदी त्यांचेकडे होती. शिरडीचे आप्पा कुळकर्णी हे बाबांची आज्ञा घेऊन जमाबंदी करता नगरास जावयास निघाले. कलेक्टरचे चिटणीस कोण आहेत याबद्दल बाबांनी आप्पाजवळ चौकशी करून बाबांनी तुला बोलाविले आहे. असा माझा निरोप नानास सांग असे आप्पास सांगितले. आप्पांनी नगरास गेल्यावर बाबांचा निरोप नानासाहेबांस सांगितला. नानासाहेबांनी येत नाही म्हणून जबाब दिला; आप्पा परत आल्यावर त्यांनी ही हकीकत बाबांना सांगितली. बाबा म्हणाले बरे पुन्हा जाशील तेव्हां हाच निरोप नानाला सांग; या प्रमाणे तीन वेळा झाले. शेवटी नानासाहेबांनी येण्याचे कबूल केले.

पुष्कळ दिवस रद्दी म्हणून गाठोड्यात बांधून ठेवलेला व मानेवर थोडा फाटलेला अलपाकाचा कोट घालून ते एके दिवशी बाबांकडे यावयास निघाले. पण आपण एखाद्या संताकडे जात आहोत, की अप्पांच्या नादी लागून एखाद्या भणंग फकिराकडे जात आहोत; व संताकडे जात असू तर त्यांच्या पुढे ठेवण्यासाठी आपल्याजवळ काहीच नाही, अशा प्रकारचे विचार त्यांच्या मनात डोकावू लागले. पुढे शिरडी जवळ जात असता सहज म्हणून त्यांचे हात खिशात गेले तो काय आश्चर्य! एक पुडी त्यांना सापडली. ती उघडून पाहाता तीत तीन-चार बदामबिया व तीन चार खडीसाखरेचे खडे त्यांना आढळून आले. त्यांना आनंद झाला. ते बाबांकडे गेले व बाबांना साष्टांग नमस्कार घालून त्यांच्यापुढे ती पुडी ठेवून ते बाबांजवळ बसले व मला कां बोलावलं, म्हणून त्यांनी बाबांना विचारले,

"अरे, जगात एकच का नाना आहे व मी तुलाच कां बोलावले, याचं काही कारण असेलच, की नाही. तुझी व माझी चार जन्मांची संगती आहे. तुला माहीत नाही, पण मला माहीत आहे."

नानांचा या गोष्टीवर विश्वास बसेना. नानांच्या आग्रहावरून बाबांनी त्या पुडीतील थोडासा बदामाचा तुकडा व खडीसाखरेचा खडा ठेवून बाकीची पुडी नानांना परत दिली व आता असेच येत जा, असे नानांना परत जाताना सांगितले.

## प्लेग

पुढे काही दिवसांनी नगरास प्लेग सुरू झाला. व प्लेगची लस टोचून घेण्याकरिता कलेक्टर साहेबांनी नानासाहेबांस सुचविले. नानासाहेबांनी बाबांना विचारले. बाबा म्हणाले टोचून घ्यावे "आपल्याला काही होणार नाही." नानासाहेबांनी टोचून घेतले. त्यामुळे त्यांच्या कचेरीतील सर्व मंडळींनी टोचून घेतले व इतर सुमारे २-३ शे मंडळींनी टोचून घेतले. कोणास कांही झाले नाही. साहेबही खूष झाले. असे झाल्यावर नानासाहेबांची बाबांवर थोडीथोडी भक्ती बसूं लागली व बाबा म्हणजे नुसते फकीर नव्हेत असे त्यांना वाटू लागले.

एकदा नानासाहेब हरिश्चंद्राचे डोंगरावर देवीच्या दर्शनासाठी म्हणून गेले, पण डोंगराच्या मध्यावर आल्यावर त्यांना वरती चढवेना व खालीही उतरवेना, यातच तहानेने ते व्याकूळ झाले. ते एका दगडावर थकलेल्या अवस्थेत बसले. एवढ्यात एक भीळीविक्या आला. त्याच्याकडे पाण्याची त्यांनी विचारपूस केली, तेव्हा तू जिथे बसला आहेस, तिथे पाणी आहे, असे सांगितले व खरोखरच नाना जिथे बसले होते, तिथे पाणी मिळाले.

काही दिवसांनी नाना बाबांच्या दर्शनासाठी शिरडीस गेले तेव्हा बाबांनी त्यांना य गोष्टीची आठवण करून दिली. तेव्हा नानांना बाबांचे खूप कौतुक वाटले व बाबांवरील त्यांची श्रद्धा दिवसेंदिवस वृद्धिंगत होऊ लागली.

## वडिलांचे गुरु ब्राह्मण व चिरंजीवांचे मुसलमान. दिसण्यात विचित्र दृश्य.

नानासाहेबांचे वडील कवाडचे सखाराम महाराजांकडे जाणारे व नानासाहेब शिरडी बाबांकडे जाणारे. सखाराम महाराज ब्राह्मण व बाबा मुसलमान असा त्या वेळचा सम होता. या दोन गोष्टींचा मेळ बसावा कसा? बरे नानासाहेबही त्यावेळी लहान नव्हे बी.ए. होऊन नोकरी करीत होते. एकावेळी तर अशी मजा आली की नानासाहेबां वडिलांचा व कल्याणातील मुसलमान लोकांचा कांही कारणावरून बेबनाव झाला, म्ह त्या दिवसापासून आपण कोणाही मुसलमानाचे घरी जावयाचे नाही व कोणाही मुसलमा आपले घरी येऊ द्यायचे नाही असा त्यांनी निश्चय केला. त्याचवेळी नानासाहेब किरव रजा घेऊन कल्याणास आले होते. गावात नानासाहेबांचे पुष्कळ मुसलमान स नानासाहेब घरी आल्यावर त्यांना वडिलांचा निश्चय कळला. तेव्हा त्यांनी हळूच वड विचारले की मी मुसलमानांकडे जाऊ का नको. वडील म्हणाले तू त्यांचे घरी जा, पण त्यांना आपले घरी आणत जाऊ नकोस. नानासाहेब म्हणाले बरे प शिरडीस साईबाबांकडे जातो व ते तर मुसलमान आहेत मग मी त्यांच्याकडे जाऊ

नको! वडील म्हणाले त्यांचेकडे जात जा. तेच तुझे गुरु आहेत. वडलांनी असे सांगितल्यावर अर्थात नानासाहेबांना फार आनंद झाला.

## नाताळचे सुट्टीत सुशिक्षित भक्तांची बाबांकडे गर्दी व बाबांचे प्रसिद्धी करण

तोपर्यंत बाबा मुसलमान आहेत. असाच नानासाहेबांचा ग्रह होता. पण पुढे अतिसहवासाने व सूक्ष्म निरीक्षणाने तो साफ बदलला व बाबा हिंदु ब्राह्मण संन्यासी आहेत असा पूर्ण विश्वास बसून तो शेवटपर्यंत कायम राहिला.

नानासाहेबांना बाबांचे वारंवार अनुभव येऊ लागले व त्यामुळे नानासाहेब आपल्या बरोबर बाबांकडे येण्यास व सांसारिक व पारमार्थिक लाभ करून घेण्यास आपल्या पैकी ओळखीच्या पुष्कळ सुशिक्षित स्नेही व अधिकारी मंडळीस प्रेमाची व आग्रहाची विनंती करीत व त्याचप्रमाणे त्यांना आपले स्वानुभव व इतर भक्तांच्या संबंधाने बाबांनी केलेल्या अगम्य लीलावर ठिकठिकाणी प्रवचने करून त्यांचे मन बाबांकडे येण्यास वळवीत. हळू हळू पण अल्प काळातच हा सद्भक्तजन संमर्द गंगौघ शैलधीप रत्नाकराकडे झपाट्याने जाऊ लागला. विशेष करून हा स्वादु सरित्सागरसंगम बाबांचे पुण्य नगरीत प्रथम प्रथम कांही वर्षे नाताळचे सुट्टीत होत असे.

पुढे नानांनी शिरडीस एक छोटेसे घर बांधले व ते तिथे रहावयास जात. त्यांनी ठिकठिकाणी तंबू बांधून बाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भक्तांची सोय प्रथम केली. आपल्या पदरच्या खर्चाने त्यांनी एक खाणावळ काढली. बाबा निरनिराळ्या लोकांकडून, मारवाड्यांकडून रकमा आणून आपल्या भक्तांची योग्य ती संभावना करीत असत व नानासाहेब शिरडीस आले, म्हणजे त्यांना त्या रकमेची भरपाई करण्यास सांगत असत व नाना पण न कुरकुरता सारे पैसे चुकते करीत व मारवाड्यांच्या पोहोच पावत्या घेऊन त्या बाबांच्या चरणी अर्पण करीत. या व्यवहारानिमित्त बाबांनी नानासाहेबांना अनेक प्रकारचा उपदेश करून अनेक अनुभव दिले. नानांना बाबांच्याकरिता शिरडी कार्यासाठी अत्युकृष्ट भावनेने व अमर्याद प्रेमाने कमीत कमी दहा हजार रुपये खर्च केले. नानांनी बाबांची फार मोठी हयातभर सेवा केली. ता. २१-८-१९२१ रोजी श्रावण कृ. ४ शके १८४३ रोजी नानासाहेब कल्याण येथे आपल्या स्वतःच्या घरी श्रीसाईचरणी विलीन झाले.

श्रीसाईबाबा नानासाहेबांच्या जवळ स्पष्ट व मनमुराद बोलत असत. बाबांना प्रख्यातीस आणण्यास व त्यांची सुकीर्ती वाढविण्यास नानासाहेबच कारणीभूत आहेत, असे म्हणावे लागल्यास ते अतिशयोक्तीचे होणार नाही. बाबा मूळचेच अमोलरत्न; परंतु हे अमोल रत्न शिरडीसारख्या लहानग्या गावात पडले, त्यामुळे त्यावेळी त्यांची प्रसिद्धी जेवढी व्हायला पाहिजे होती. तेवढी झाली नव्हती; पण नानासाहेबांच्यामुळे अनेक पदवीधर व बडी बडी मंडळी शिर्डीस फार मोठ्या प्रमाणावर येऊ लागली व बाबांची उज्ज्वल अशी कीर्ती सगळीकडे पसरली. बाबांनी नानांना परमार्थाचे अनेक घडे दिले, अनुभव दिले, दृष्टांत पण दिले.

एकदा श्री बाबांनी नानांना 'तद्विद्धि प्रणिपातेन' या गीतेतील श्लोकाचे स्वतः विवरण करून सांगितले, ती घटना अशी :

एकदा नाना बाबांचे पादसंवाहन करीत असताना तोंडाने काहीतरी गुणगुणत असल्याचे पाहून श्रीबाबांनी त्यांना विचारले,

"अरे नाना, काय गुणगुणतो आहेस, जरा मोठ्याने तरी म्हण, आम्हाला पण ऐकू दे."

यावर नाना अदबीने म्हणाले,

"काही नाही, बाबा सहज गीतेचा पाठ म्हणत होतो,"

"असे का? छान?" श्रीबाबा उद्‌गारले व जो श्लोक नाना गुणगुणत होते, तो मोठ्याने म्हणण्यास व त्याचा अर्थ विशद करण्यास त्यांना सांगितले. तेव्हा बाबांच्या आज्ञेनुसार नानांनी पुढील गीताश्लोक मोठ्याने म्हणून दाखविला तो असा —

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया।
उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्व दर्शिनः॥
(अ. ४ श्लोक ३४)

हा मूळ श्लोक म्हणून झाल्यावर नानांनी आपल्या परीने अर्थ सांगण्यास सुरूवात केली. ते म्हणाले,

"जो कुणी गुरुपदी प्रणिपात करून, स्वतःचे जीवित गुरुसेवेस वाहातो व आदराने प्रश्न पुसून स्वतःचे समाधान करून घेतो, त्याला ज्ञानीजन ज्ञानोपदेश करतात." असे सांगून नाना पुढे म्हणाले, बाबा माझ्या माहितीप्रमाणे गीतेच्या सर्व भाष्यकारांनी गुरुसेवा, गुरुप्रणति ही ज्ञानसंवित्तिदायक असल्याचे स्पष्टपणे सांगून जो कुणी या मार्गाने जाईल, त्याला तत्त्वदर्शी ज्ञानी ज्ञानाचा रस्ता जरूर दाखवितील, असे स्पष्टपणे आश्वासन दिले आहे.

श्रीबाबांनी हे स्पष्टीकरण ऐकून घेतले व म्हणाले,

"पहिल्या दोन चरणांचा अर्थ मला मान्य आहे; पण उत्तर श्लोकाचा जो अर्थ तू सांगितलास, तो माझ्या मते बरोबर नाही. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनं स्वत्त्वदर्शिनः या चरणात 'ज्ञान' शब्दाऐवजी 'अज्ञान' हा शब्द घेतला पाहिजे. वास्तविक हा चरणच उपदेक्ष्यन्ति तेऽज्ञानं ज्ञानि स्तत्व दर्शिनः असा असावयास हवा होता, अरे, असे पाहा, 'ज्ञान' हा काय बोलाचा विषय आहे, म्हणून त्याचा उपदेश करता येईल? 'ज्ञान' हे शब्दातीत असून 'अज्ञान' मात्र उपदेशाचा विषय होऊ शकते. भगवंतांनी गीतेत स्पष्टपणे सांगून ठेवले आहे, की ज्याप्रमाणे गर्भ वारेने वेष्टिलेला असतो किंवा आरशावर मळ, धूळ, साचलेली असते, तसेच ज्ञान हे अज्ञानाने वेष्टिलेले असते. ज्ञान दूर केले गेले, की ज्ञान स्वयंप्रकाशू लागेल. लक्षात ठेव, की 'ज्ञान' ही जाणावयाची वस्तू नाही, तसेच ती उपदेशांची पण नाही. फक्त प्रणिपात, परिप्रश्न सेवा ह्या गुरुकृपेच्या साधनांच्या माध्यमाने त्याचा उदय प्रत्येकाच्या अंतःकरणात होऊ शकेल."

आपल्या ह्या विधानाच्या स्पष्टीकरणार्थ रज्जू-सर्प, सुवर्ण-काट (सुवर्ण गंज) वगैरे उदाहरणे देऊन श्रीबाबा शेवटी म्हणाले,

"सारांश, अज्ञानाचा समूळ नाश झाल्यावर जे उरेल, ते शुद्ध ज्ञान असेल, हेच वर उदधृत केलेल्या श्लोकाचे हद्‌गत आहे."

हे गोड निरूपण ऐकून नानासाहेब चांदोरकरांनी श्रीबाबांच्या चरणी लोटांगण घातले व दोन्ही हातांनी त्यांचे चरण वंदिले.

ही कथा श्रीसाईसच्चरित या साईबाबांच्या चरित्रग्रंथात अध्याय ३९ मध्ये आलेली आहे. ज्या अभिनव पद्धतीने वरील श्लोकाचा श्रीबाबांनी अर्थ विशद केला, त्यावरून त्यांचे संस्कृत भाषेवरील प्रभुत्व दिसून येते.

## कीर्तन रूपाने बाबांचे प्रसिद्धीकरण

श्री. गणपतराव सहस्त्रबुद्धे उर्फ दास गणूमहाराज त्यावेळी नगर येथे पोलीस खात्यात कारकून होते. त्यांना लावण्या करण्याचा फार नाद असे, नानासाहेबांचे लक्षात ही गोष्ट आली. नानासाहेबांनी त्यांचे मन कीर्तने करून बाबांची प्रसिद्धी करण्याकडे वळविले. नानासाहेबांचे घरी श्री. दामु अण्णा आठवले म्हणून लहान वयाचे पण गोड आवाजाचे ब्राह्मण होते. त्यांना दासगणू महाराजां मागे कीर्तनात साथीदार म्हणून दिले. या दुकलीमुळे कीर्तनात रंग चढून दासगणू महाराजांचा महाराष्ट्रभर जिकडे तिकडे बोलबोला झाला. या उपायाने बाबांच्या प्रसिद्धीकरणाचे सर्व श्रेय नानासाहेबांनाच आहे.

## भक्त लीलामृत व संतकथामृत रूपाने बाबांचे प्रसिद्धीकरण

पुढे कांही काळांनी बाबांनी श्री. दासगणू महाराजांना श्री. महिपती यांनी वर्णिलेल्या संताच्या चरित्रानंतरच्या संतांची चरित्रे वर्णन करण्यास आज्ञा केली व त्या चरित्राच्या छपाईचे काम करण्यास नानासाहेबांना आज्ञा केली. त्याप्रमाणे श्री. दासगणू महाराजांनी शक्य तितकी खटपट करून व जिवापाड श्रम करून ती चरित्रे त्यांच्या भक्तलीलामृत, संत लीलामृत व संत कथामृत या नावाच्या प्रसिद्ध ग्रंथात वर्णिली व त्यांच्या छपाईचे व प्रसिद्धीकरणाचे सर्व काम नानासाहेबांनी आपल्या पदर खर्चाने केले.

श्री. दासगणूकृत भक्तलीलामृत ३२-३३ या दोन अध्यायात व संत कथामृत अ. ५७ यात बाबांनी नानासाहेबांस केलेल्या व्यावहारिक व पारमार्थिक वेदांतोपदेशाचे अत्यंत सुरस, सुंदर व रसाळ वर्णन आहे. हे ही एक प्रकारचे बाबांचे स्वतंत्र प्रसिद्धीकरण आहे.

## साठे साहेब यांचा वाडा

बाबांची प्रसिद्धी जसजशी जास्त होऊ लागली तसतशी नानासाहेबांनी भक्तगणांकरता केलेल्या उतरण्याच्या व खाण्यापिण्याच्या सोई अपुऱ्या पडू लागल्या. श्री. हरी विनायक उर्फ तात्यासाहेब साठे जमीन महसूल स्मृतिकार यांना बाबांचा अनुभव आल्यामुळे व वरील गैरसोय त्यांच्या नजरेस आल्यामुळे त्यानी भक्तांच्या उतरण्याच्या सोयीसाठी शिरडीस एक चौसोपी वाडा बांधला. नंतर पुढे काही कारणांनी त्यांनी तो श्री. रामकृष्णपंत नवलकर मुंबई हायकोर्ट वकील यांना विकला.

## काकासाहेब दीक्षितांचा वाडा

तसेच नानासाहेबांचे अत्यंत व जिवलग आंग्लविद्या उच्चपीठ स्नेही कै. हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित हे १९०९ सालात नानासाहेबांच्या विनंतीवरून बाबांच्या दर्शनास

शिरडीस आले. त्यांच्याही लक्षात भक्तगणांच्या उतरण्याची गैरसोय आली व त्यांनी लागलीच तेथे एक दोन चौसोपी वाडा बांधला व त्यात पुष्कळसे भक्तगण सहकुटुंब अल्पकाळ राहतील अशी व्यवस्था केली.

## नानासाहेबांवरील बाबांचे अद्वितीय प्रेम

बाबांचे नानासाहेबांवर व नानासाहेबांचे बाबांवर अलोट व अप्रतिम प्रेम असे, हे वरील विवेचनावरून लक्षात येईलच व अशा सद्‌गुरु व सच्छिष्यांची जोडी सापडणे अति दुर्लभ.

**''मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चित् यतति सिद्धये ॥**
**यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्वतः ॥**

**अर्थ** :— हजारो मनुष्यात मत्प्राप्तिसिध्यर्थ एखादाच प्रयत्न करतो व असा प्रयत्न करणाऱ्या हजारो सिद्ध पुरुषात मला एखादाच खरोखर जाणतो॥ श्री. भ. गी. श्लो. ३ अ. ७ त्याचप्रमाणे.

**बहूनांजन्मना मंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥**
**वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः'' ॥**

**अर्थ** :— पुष्कळ जन्मानंतर मला ज्ञानी भक्त मिळतो. व वासुदेवमय सर्व विश्व आहे असे जाणणारा महात्मा भक्त तर अतिशयच दुर्लभ असतो. श्री. भ. गी. अ. ७ श्लो. १९.

वरील जोडी पुष्कळांशी तशीच दुर्मिळ समजण्यात अतिशयोक्ति होणार नाही.

बाबांनी नानासाहेबांस काय काय अनुभव दिले आहेत व अमोल उपदेश केला आहे त्याचे वर्णन जितके करावे तितके थोडेच. परंतु चार पाचशे वर्षांपूर्वीच्या संत चरित्रात ज्या आपण सद्‌गुरुंच्या लीला ऐकतो की नाथांचे घरी पैठणास पांडुरंग हे श्रीखंड्या या नावाने श्री गोदावरीचे पाणी कावडीने वाहून देव पूजेकरता गंध उगाळून ठेवीत असत, सद्‌भक्त दामाजीपंताकरता पांडुरंगांनी मंगळवेढ्याच्या विठू महाराचे सोंग घेऊन बेदरचे बादशहाकडे पैसे पोचवून बादशहाची पावती दामाजीपंतांना दिली, सांवता माळ्याचे बागेत पांडुरंगांनी माळ्याचे काम केले, जनाबाईची लुगडी धुतली, त्याचप्रमाणे जामनेर गावी नानासाहेब मामलेदार असता त्यांच्या मुलीची (मैनाताई) बाळंतपणातून सुटका होण्याकरता नानासाहेब-बाबांचा धावा करीत असता बाबांनी शिरडीचे बापुगीर गोसाव्या बरोबर आरती व उदी देऊन बापुगिरास जळगाव स्टेशनवर पाठवून बाबा स्वतः आपणच तांगा, तांग्याचे घोडे, तांगेवाला, गुळपापडीचे लाडू, आंबे व पेढे घेऊन, बापुगिराजवळ ते फराळाचे सामान देऊन तांगा-घोडे तांगेवाल्यासह पुढे अंतर्धान पावले ही हकीकत अगदी अलीकडची आहे. ती श्री साईचरित्राचे ३३ अध्यायात वर्णिली आहे. त्यावरून नानासाहेबांवरील अलौकिक प्रेमाची ही बाबांची लीला आहे हे दिसून येईल. नानासाहेबांचे जिव्हेवर निरंतर बाबांचे नाव नाचत असे. ते बाबामय झाले होते.

नानासाहेबांच्या २१ ऑगस्ट रोजी येणाऱ्या ६५ व्या पुण्यतिथीप्रसंगी त्यांना भक्तांचे कोटी कोटी प्रणाम.





# संत सावतामाळी



बाल साईभक्तांनो, शके १२१७ आषाढ वद्य १४ ता. १२ जुलै १२९५ या दिवशी पंढरपूर जवळच्या अरणभेंडी येथील भगवद्‌भक्त सावतामाळी यांनी समाधी घेतली. लौकीक दृष्टीने त्यांचा देहान्त नवज्वरामुळे झालेला असला तरी ते महापुरुषाचे प्रयाणच होय. कारण अवतार संपवून देह सोडतांना त्यांनी आसन मांडून ध्यानमुद्रेत व समाधीमग्न अवस्थेत तो मांडला होता यामुळे अंती मती तीच गती या न्यायाने -ईश्वर चिंतनात मग्न असताना हे प्रयाण घडले असल्यामुळे असले महापुरुष ब्रह्मीभूत होतात - ते मर्त्य जीव उरत नाहीत.

इ.स. १२५० शके, ११७२ च्या सुमारास त्यांचा जन्म झाला. मुलाचे जातक पहाण्याकरिता पिता परसोबा आणि माता नागिता हे जोडपे शूचिर्भूत होऊन ब्राह्मणाकडे गेले असताना ज्योतिषानी "हे मूल मूळ नक्षत्रावर जन्मले असून ते तुमच्या मूळावर जन्मास आले आहे" असे भविष्य सांगितले. या मूळ नक्षत्राची भीति सामान्यतः सर्वांनाच वाटते म्हणून आईबाप घाबरले. त्यांना ज्योतिषांनी हे मूल टाकून देण्याचा सल्ला दिला.

पंढरपूरच्या यात्रेत नदी किनारी मूल सोडले तर कुणीतरी ते नेईल व त्याचा सांभाळ करील या हेतूने त्यांनी ते मूल दुपट्यात गुंडाळून वाळवंटी ठेवले. इतक्यात म्हाताऱ्या ब्राह्मणाचे रूप घेऊन भगवान त्यांच्या पाठीशी प्रगटले व त्यांना म्हणाले, अहो हे काय करीत आहांत?

त्यावर परसोबांनी हे मूल आमच्या मुळावर आलेले आहे म्हणून आम्ही ते सोडत आहोत असे उत्तर दिले. तेव्हा देव म्हणाले "असे न करता ते तुम्ही एखाद्या ब्राह्मणाला

किंवा मलाच दान कां देत नाही! दान दिल्याने मुलगा तुमचा उरणार नाही व मग तुम्हाला मूळ नक्षत्राचे भयही राहणार नाही. ते त्याच्या नव्या पित्याला राहील''

भगवंतांचा हा युक्तिवाद मातापित्यांना पटला, त्यांनी संकल्प सोडून ते मूल ब्राह्मणाच्या ओटीत घातले. त्याचा स्वीकार करून देव नागिता बाईस म्हणाले, ''आता हा मुलगा तुझा नव्हे. माझा झाला पण मी याला कसे काय पाजणार? तेव्हा मुलाची दाई म्हणून तू याला पाजण्यापुरते म्हणून मुलास घरी ने आणि एवीतेवी तुम्ही याचा त्यागच केला आहे तेव्हा तो तुम्ही 'सवता' (वेगळा) केला असल्यामुळे त्याचे नाव 'सवता' असे ठेवा व त्याचा प्रतिपाळ करा'' असे म्हणून देव अंतर्धान पावले.

इतक्यात तो ब्राह्मण अदृश्य झाला. मातापिता चकीत झाले. साक्षात् पांडुरंगानेच आपली काळजी दूर केली व त्यानेच आपल्या मुलाचा स्वीकार केला हे जाणून आईबापांनी मूल घरी नेले व ते देवास सोडल्याची खूण म्हणून त्याचे नाव 'सावता' ठेवले. यामुळे आपोआपच देव माझा मी देवाचा हा भक्ताचा अनन्यभाव सावता याच्या मनात बाळपणापासून पक्का रूजला व ते देवाचे अनन्य भक्त बनले. ते माळी जातीतले त्यामुळे मळ्यात शेतीचे काम करीत. पण ते करता करता विठ्ठलाचे नामस्मरण करीत. साक्षात् देव सावताबरोबर बोलत असत. एकदा मळ्यात काम करीत असताना त्यांनी हातातील विळ्याने आपली छाती चिरली. तो तीत देव प्रवेश करते झाले. पण मुद्दामच शेल्याचा पदर थोडासा बाहेर राखून. प्रेमाचा सागर असलेल्या सावतांनी जखम झाकली म्हणून धोतर गुंडाळले व वरती घोंगडी लपेटून ते आपल्या मळ्यातील मोटेकडे गात गात निघाले.

''लाडक्या हरी यावे माझ्याच मोटेवरी''

सावता माळ्यांच्या हृदयात प्रवेश करण्यापूर्वी नामदेव-ज्ञानदेव व विठोबा बोलत येत होते व सावतांच्या मळ्याकडे येताच देव म्हणाले मी सावताला मिनिटभरात बघून येतो पण थोडावेळ झाला तरी देव आले नाहीत म्हणून नामदेव-ज्ञानदेव मळ्यात आले व सावतांना म्हणाले, महाराज देव कुठे आहेत? तुम्हाला भेटण्याकरिता श्री हरी येथवर आले होते. तेव्हा सावता म्हणाले,

आले लिंबु कोथिंबिरी। अवघा झाला हरी।<br>
कांदा मुळा भाजी। अवघी विठाबाई माझी।

नामदेवा मला तुझा देव कोठे दिसतच नाही. माझा मळाच मला देव आहे. नामदेव म्हणाले, काका! थट्टेवारी नेऊ नका! तुमच्याकडे गूळपाणी घेऊन येतो म्हणून ते म्हणाले व आम्हाला दोघांना झाडाखाली बसवून ते येथवर आले.''

सावता म्हणाले, ''विश्वव्यापक विठोबा! त्याला मी रे कोठे दडविणार! पहा साऱ्या कणगी, उतरंडी भांडीकुंडी॥ मी काही त्याला लपविला नाही. नामदेवांनी चोहोकडे बघितले मग त्यांच्या ध्यानी आले की सावताने घोंगडी पोटाशी लपेटली आहे. देव त्या घोंगडीत लपले असावेत. त्यांनी घोंगडी आढेवेढे घेऊन दूर केली. देवाच्या शेल्याचा पदर बाहेर

डोकावत असल्याचे पाहून हसत हसत नामदेव म्हणाले काका! धोतर दूर करा. देव त्यात लपले आहेत.

धोतराची पट्टी दूर करताच जखम उघडी पडली व ती पहाताच नामदेव भयचकीत झाले. ते म्हणाले ''काका! कशाला हे धारिष्ट्य केलेत?''

यावर ज्ञानदेव म्हणाले, नामदेवा हे तुमच्याचसाठी, गुरु केल्यानंतरही ज्ञानी भक्ताचे भक्ती प्रेम नाश पावत तर नाहीच उलट ते भरभरून वाढते. याचा रोकडा प्रत्यय तुम्हास देण्यासाठी सावताकाकांनी देव पोटी साठवून आपले देवावरचे प्रेम मूर्त स्वरूपात व्यक्त केले.

नामदेव म्हणाले, ''बाबांनो हे मला सारे पटले पण आता देवांना बाहेर काढा ना!'' एवढे म्हणून त्यांनी सावता महाराजांपुढे धन्य धन्य म्हणत लोटांगण घातले. नामदेवांचा भ्रमनिरास झाला हे पाहून देव सावतांच्या पोटातून बाहेर आले आणि आपल्या करस्पर्शाने त्यांचे पोट होते तसे करीत नामदेवांना म्हणाले, नामदेव तुझी चिंता संपली ना! आता तू गुरु कर कसा!'' यावर नामदेव म्हणाले, ''देवा येथे तर दोघे गुरुच आहेत. मी कोणाला निवडू?'' देव म्हणाले ''तू आत विसोबा खेचरांकडे जा त्यांचा अनुग्रह तू घे.'' आणि म्हणून नामदेवांनी मोठ्या भक्तिभावाने व प्रेमाने

धन्य ते अरण चिद्रत्नाची खाण। जन्मला निधान सावता तो॥१ ॥
सावता सागर प्रेमाचा आगर। धरिला अवतार माळ्यावरी॥ २॥
धन्य त्याची माता धन्य त्याचा पिता। साठविला त्राता त्रैलोक्याचा॥३ ॥
नामा म्हणे त्याचा जन्म सुफळ झाला। वंश उद्धरला माळियाचा॥४ ॥

या उद्‌गारात त्यांचे चरित्र गुणगान केले आहे.

तेराव्या शतकात पंढरीचा विठ्ठल लेकुरवाळा झाला होता. ज्ञानेश्वर, नामदेव, यांचे नेतृत्व लाभून प्रत्येक ज्ञातीमध्ये एक महान संत निर्माण झाला. 'देव भावाचा भुकेला। प्रतिकुल नाही त्याला।' असा सर्वांचा भाव असल्यामुळे जातिभेदाचे स्वरूप कमी होत होते. सावता माळी बागकामाचे आपले कर्तव्यकर्म करीत असतानाच वैकुंठीचा देव आणू या किर्तनी। विठ्ठल गाऊनी नाचे रंगी॥ एवढा आत्मविश्वास त्यांचेमध्ये निर्माण झाला. बागकाम करीत असताना 'माझी विठाई, कांदा मूळा, भाजी, लसूण, मिरची, कोथंबिरी' या रूपाने नटून आली आहे अशी ह्यांची भावना असे. मुलांनो, सावता माळ्यांनी खूप अभंग रचले. उदाहरणादाखल एक अभंग पहा.

सुखाचा सोहळा करूनी दिवाळी
प्रेम वनमाळी चित्ती धरू॥
सावंता म्हणे ऐसा भक्तिमार्ग धरा॥
तेणे मुक्ति द्वारा वोळंगती

सावता माळी ज्ञानदेव व नामदेवांचे समकालीन होते. पंढरीस भागवत धर्म वाढीस लागला होता. तेव्हा सावताही पंढरपूरास येऊ लागले. नामदेवांचे किर्तन ऐकून ते पण अरणगावी किर्तन करू लागले. पण किर्तन किंवा उपदेश करण्याचा अधिकार काय तो ब्राह्मणाचाच असे म्हणून लोकांनी त्यांचा छळ करण्यास सुरुवात केली व त्यांनी

सावतोबांना कीर्तन बंद करावे अशी विनंती केली. पण सावतोबा ऐकेचनात तेव्हा लोकांनी त्यांची झोपडी, मळा ही पेटवून दिली. आपल्या सोन्यासारख्या मळ्याची राखरांगोळी झाली तरी सावतोबा आपले शांतच होते.

सावताबुवांच्या घरी जाऊन ज्ञानदेव-नामदेवांनी व पांडूरंगानी दर्शन दिल्यामुळे सावताबुवांची योग्यता मोठी यात शंकाच नाही. त्यांची समाधी अरणभेंडी येथे आहे. सोलापूर जिल्ह्यात मोडनिंब स्टेशन नजिक पुणे-सोलापूर मोटार मार्गावर हे लहानसे गाव आहे. आज तिथे सावतोबांचे मोठे मंदिर व मंडप आहे. सावताबुवांनी स्वतः फोडलेली विहिर मंदिरास चिकटून आहे. दरवर्षी तिथे पुण्यतिथीचा उत्सव मोठ्या प्रमाणावर साजरा होतो; व चैत्र वद्य एकादशीस द्वादशीस समाधीस्थानी चंदनाच्या उटीची यात्राही असते.

सदाचार, सदविचार व सत्कर्म यायोगे परमेश्वर प्राप्त होतो असा सावता बुवांचा दृढविश्वास होता, मुलांनो, हा सावता बुवांचा संदेश त्यांच्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने आपण आचरणात आणण्याचा प्रयत्न करू या.

## साईनाम ते गावे

साई नाम ते गावे, अंतरा तोषवावे  
साई रूप पहावे, लोचना सुखवावे  
साई तीर्थ प्राशावे, अमृत ते जाणावे  
साई मूर्ति स्पर्शावे, धन्य धन्य हो व्हावे  
साई तुमची कीर्ति, ऐकिली मी दिगंती  
यावी मज प्रचीति, पटविती महती  
म्हणूनि आलो शिर्डी तीर्थासि, तार म्हणे रे ह्या बालकासी  
नको मजला मोह व माया, व्यर्थ ही रे कष्टण्यासी काया  
देह न माझा, आत्मा न माझा, किंतु अहंकार मात्र माझा  
अहंकाराचा व्हावा ॐकार, परमात्माचि व्हावा साकार  
आत्मा अंशचि परमात्म्याचा, विलीन व्हावा अंतरी त्याच्या  
ओढ ही जीवा ह्या साईदासा, तवदर्शनासी जो हा प्यासा

— श्री. गजानन मुरलीधर कुळकर्णी  
पूजा ३/त/१९, जवाहरनगर,  
जयपूर - ३०२ ००४.

# नमस्कार साष्टांग श्री साईबाबा

श्री. जनार्दन बांदेकर
'रायगड निवास,
मुंबई.

श्री साईबाबांचे नाव न ऐकलेली अशी व्यक्ति हजारात एक मिळेल! सध्या बाबांचे लाखो भक्त (सेवक) आज भारतात नव्हे, तर बाहेर देशातही आहेत. ह्याची सत्यता जाणवते.

श्री साईबाबांचे चरित्र थोर लेखकांनी/भक्तांनी लिहिलेली आहेत, तर बाबांबद्दल अधिक ते असे माझ्यासारख्याने लिहिणे म्हणजे योग्य नाही तरी मला इच्छा झाली, आणि बाबांनी स्फूर्ती दिली म्हणून साईभक्तांपर्यंत हा माझा लेख पोहोचावा म्हणून साईलीला मासिकामधून पाठवीत आहे.

आजपर्यंत साईभक्तांची संख्या एवढी वाढली आहे, की शिर्डी क्षेत्री जाऊन पाहिल्याशिवाय विश्वास बसणार नाही. बाबांचे कुणीही भक्त झाले नसून बाबांनी आपल्या शक्तिने/मायेने माणसांना ओढून घेतलेले आहे. नोव्हें. १९७९ ज्यावेळी मी प्रथमच शिर्डीक्षेत्री गेलो त्यावेळेची भक्तांची गर्दी आणि मार्च १९८६ सालची भक्तांच्या शिर्डीला पाहिलेल्या रांगाच रांगा, आणि उत्सवांच्या दिवशी जमा झालेले भक्तगण पाहून डोळ्यांचे पारणे फिटून जाते. दिवसेंदिवस बाबांच्या भक्तांची संख्या वाढत आहे.

शिर्डी येथील समाधीला स्पर्श करताच बाबांचा मिळणारा आर्शिवाद जळत्या धुनी मधील भक्तांनी मस्तकाला लावलेल्या उदीची प्रचिती, शिर्डी क्षेत्री (गांवी) पाऊल ठेवताच मनाला होणारा आनंद शिवाय आज जो शिर्डी गांवाचा कायापालट झालेला दिसून येतो, अनेक मजली गगनचुंबी इमारती, (करोड रुपये किंमतीच्या) ह्या सगळ्या गोष्टी बाबांच्या आशिर्वादाशिवाय पूर्ण झाल्या नसत्या, मशिदीची द्वारकामाई झाली नसती हे सत्य आहे.

दुपारी/रात्रौ भक्तगण जो साईप्रसाद घेतात त्यानंतर कुणाही भक्ताची तक्रार नाही की, जेवणानंतर माझे पोट/डोके दुखते म्हणून आणि विशेष म्हणजे प्रसाद इतका स्वादिष्ट आणि रूचकर लागतो की खरोखरच बाबांच्या आशिर्वादाशिवाय हे शक्य नाही, हे भक्तांनी सत्य जाणावे. संसारात स्वतःच्या मेहनतीची चटणी-भाकरी खाऊन ज्याप्रमाणे मानसिक समाधान वाटते, त्याच प्रमाणे बाबांच्या आशिर्वादाने मिळालेला प्रसाद भक्षण केल्यानंतर एक प्रकारचा आनंद होतो.

भक्तांची बाबांवर जर पूर्ण श्रद्धा असेल तरच शिर्डी येथील बाबांच्या समाधीचे दर्शन मिळते अन्यथा नाही. बाबांची द्वारकामाई गुरूस्थान, गोड/कडू लिंबाचे झाड, लेंडीबाग, बागेतील बाबांची विहिर, ज्ञानदीप, दत्तमंदिर गणेश्वर मंदिर आणि खंडोबाचे देऊळ इत्यादींचे दर्शन झाल्यावर जो मनाला आनंद होतो त्याची किंमत करता येणार नाही आणि त्यामुळे भक्तांच्या व्याधी, दुःख, क्लेश इ. भार कमी होऊन मनाला समाधान

होते आणि एक प्रकारची शक्ति/उत्साह निर्माण होऊन बाबांच्या नावाने जप केल्याने मिळणारे गोड फळ!

कांही भक्त म्हणतात, आम्ही बाबांची रात्र-दिवस सेवा, भक्ती करतो परंतु आमच्यावर संकटे, दुःखे, कां यावीत? तर बाबांची मनोभावे सेवा, पूजा अर्चा, स्मरण, पूजापाठ केल्यामुळे, भक्तांवर येणारी संकटे कमी येतात आणि दुःखाची तीव्रता कमी होऊन मन खंबीर बनते. येणाऱ्या प्रसंगाला तोंड देण्याची ताकद येते. प्रसंग निघून जाऊन मानसीक सुख मिळते.

रामनवमी, गुरूपौर्णिमा, इ. बाबांनी चालू करून दिलेल्या उत्सवांना दिवसेंदिवस इतकी गर्दी लोटते की आकाशातील चांदण्या कमी पडतील. ह्याची शिर्डी गांवी गेल्याशिवाय सत्यता पटणार नाही.

शरण मज आला आणि वाया गेला दाखवा दाखवा ऐसा कोणी। हे जे बाबांचे वचन आहे हे त्रिकाल सत्य असून भक्तांनी श्रद्धा ठेऊन सबुरी घ्यावी म्हणजे मनातील सर्व हेतू सफल होतील.

श्री विठ्ठलाचे दर्शन घेण्यासाठी पंढरपुरला जाणे म्हणजेच बाबांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी शिर्डी गांवी येण्याइतकेच असून अशा थोर/महान संताला साष्टांग नमस्कार

# सर्वज्ञ, सर्वसाक्षी श्री साईबाबा!

**श्री. मधुसूदन अंबा**
अंबाडे हाऊ
लकडी पुलासमोर, बडो

(प्रत्यक्षात घडलेली एक सत्य घटना — साई चमत्कार! साई साक्षात्कार!)

श्रद्धा आणि सबुरी! श्रीबाबांनी आपणास दिलेला गुरुमंत्रच! जीवनरूपी रथाची वाकं! आध्यात्मिक जीवनाचे आधारस्तंभ! श्रीसाईबाबांचा चमत्कारा म्हणजे आत्म विशद करून सांगणारे अलौकिक उपायन! श्रीबाबा चमत्कारा द्वारे दृढ श्रद्धा, डो श्रद्धा निर्माण करीत असतात. चमत्कारचं बीजं, श्रद्धेचं रोपटं भक्तीच्या पाण्यानं अल्पाव आत्मस्थितीचा वृक्ष तयार करण्याचं कार्य स्वयम् बाबाच करीत असतात!

दृढ श्रद्धेअभावीच संकटसमयी आपण भयभीत होत असतो. पुन्हा भक्तीत होताच, श्रद्धा दृढ होताच भयरहितही होत असतो. किंबहुना श्रद्धेत भयमुक्त करण फार मोठं सामर्थ्य आहे! सबूरीचही सामर्थ्य तितकच! सबूरीने विचार नाही केला निर्णय चुकतो आणि मग अपयश पदरात पडतं. त्या अपयशाला तोंड देण्याचं सा पुन्हा श्रद्धेतच आहे. श्रीबाबांच्या ह्या अनमोल संदेशाचं महत्त्व आपल्या जीवनात आहे ते अंतरमूख होऊन जो जो विचार करावा तो तो आपोआप मनाला पटत

एखाद्या समर्थ ज्ञानी पुरुषाचं कथन वरवर विचार केला असता मनाला पटत नसलं तरी सबुरीमुळेच कालांतराने त्याचं आकलन होतं. विपूल संपत्ती, सत्ता, सामर्थ्य, स्वास्थ्य सर्व असून सुद्धा भयमुक्त होता येत नाही. संपत्ती येताच विपत्ती अनेक रीतीने येऊन उभी रहाते. कुणाला कसली तर कुणाला कसली, चिंता ही काही केल्या सुटत नाही. शेवटी बाबांनी दिलेला 'श्रद्धा-सबुरीचा मंत्र-दोर असेल तरच त्या आधारे भयरहित, चिंतारहित राहून आध्यात्मिक जीवनातील मुक्तीचं अत्युच्च शिखर सर करता येतं.

एखादा नास्तिक देवावर श्रद्धा ठेवत नाही, पण त्याचा आपल्या बुद्धीवर मात्र पूर्ण विश्वास असतो. त्याचा हट्ट असतो की आपल्या कुशाग्र बुद्धीला पटलं तरच त्यावर विश्वास ठेवावा; आणि मग अशा बुद्धीप्रधान वा नास्तिक व्यक्तीसाठी चमत्काराशिवाय दुसरा मार्ग कुठला?

आज आपण जी सत्यकथा वाचणार आहोत ती एका दाम्पत्याला आलेला अनुभव आहे. श्रीमती सरोजताई कस्तुरी (पत्ताः ५२/३३०, एलोरा पार्क, रेसकोर्स, बडोदे) ह्या मूळ आंध्रच्या रहाणाऱ्या. लहानपणापासून भाविक आणि सात्त्विक विचाराच्या. परम् श्रद्धा त्यांच्या हृदयमंदिरी नांदत आहे. बाबा आहेत, आणि ईश्वर आहेच असा भाव दृढ झालेला आहे. त्यांच्या निर्मळ आणि प्रेमळ वागणुकीतच श्रीबाबांचे सूक्ष्म अस्तित्व जाणवल्या वाचून रहात नाही!

सरोजताईंना बीना क्लिनीक, रेसकोर्स येथे दाखल करण्यात आलं होतं. आज लग्न होऊन सहा वर्षे होऊन सुद्धा पोटी मुलबाळ नाही. मुल व्हावं ही एकच दोघांचीही इच्छा. बाबांच्या कृपेने आपल्या घरात पाळणा का बरे हालू नये? बाबांचे नाव घेऊन त्यांनी डॉक्टरी ईलाज सुरू केले होते. 'मुला वाचून घर नाही' ह्या केवळ कल्पनेनं सामान्य बाईंच्या मनी सदैव आनंद! हीच भक्तीची सार्थकता! हेच नामस्मरण सामर्थ्य!! हाच श्रद्धेचा महिमा!!!

क्युरिटिन केल्यामुळे त्रास असह्य होत होता. तरीही नामस्मरण सतत चालू होतं. त्यांचा आपला संपूर्ण भरवसा फक्त बाबांवर होता. मुखावाटे सारखे 'साईराम-साईराम' असे भावपूर्ण शब्द पडत होते. थोड्याच वेळात खूप बरं वाटलं. रात्री घरी जाण्याची रजाही दिली. सरोजताई आपल्या पतीच्या स्कुटरवर बसल्या मात्र आणि त्यांनी अवघ्या पंधरा वीस फुटावर रीतसर एक पुसट पांढरी आकृती तयार होताना पाहिली. त्यांचाच त्यांच्या डोळ्यावर विश्वास बसत नव्हता! दिव्य साक्षात्कार!

बाबांची असीम कृपा प्रत्यक्ष त्या आपल्या डोळ्यांनी पाहत होत्या! त्यांना प्रकर्षानं जाणवत होतं की हे बाबाच आहेत; पण त्या बोलू शकत नव्हत्या. पुसट आकृती आता ठळक झाली होती. वर्णनातीत दृष्य! साक्षात श्रीबाबाच तिथे प्रगट झाले होते. निर्गुण निराकार श्रीबाबा सगुण साकार होऊन उभे ठाकले होते. आज कलियुगातही साक्षात्कार घडू शकतो हे बाबांनी दाखवून दिलें होते. अति कष्ट नको. त्रास नको. कर्मकाण्ड नको. फक्त भाव हवा! 'भाव तेथे देव' ही संतवाणी सिद्ध झाली! सम्यक साधना साधण्यासाठी सरोजताईंचा सनातन सारथी सर्वेश्वर श्रीसाई साकारला!! श्रीबाबांनी

पहिलाच प्रश्न विचारला. "क्यों पुकार रही थी?" तरीही सरोजताईंनी सरळ उत्तर दिलं, "मैंने आपको नहीं बुलाया महाराज" त्यावर पुन्हा बाबा म्हणाले, "अभी दवाखाने में पुकार रही थी ना?" सरोजताई पटकन म्हणाल्या, "वो तो हम अपने शिरडी साईबाबा को बुला रहे थे, आपको नहीं बुलाया महाराज!"पुन्हा स्पष्टता करीत बाबा म्हणाले, "मैं शिरडीसे आया हुँ बेटी! फिकीर मत कर तुझे लडका जरूर होगा!" एवढं बोलून बाबांनी त्यांच्या पतीजवळ दोन रुपये मागितले. त्यांनी आपला पटकन पॅन्टच्या मागच्या खिशात हात घातला आणि एक रुपया तेवढाच सुट्टा होता, तो दिला. बाबांनी रुपया नको म्हणून म्हटलं, दोनच हवेत असं आग्रहानं सांगितलें. मनबुद्धीच्या पार असलेल्या बाबांच्या अगाध लीलेचं आकलन सामान्य मानव बुद्धीला कुठून होणार? त्यांना आपल्या पत्नीच्या प्रकृतीचीच काळजी लागून राहिली होती. म्हणून त्यांनी घाईत म्हटलं, "महाराज! इसकी तब्बेत ठीक नहीं, हमें घर जाना है, ये लेलो एक रुपिया" असं म्हणत रुपया झोळीत टाकला. आणि ते स्कुटर चालू करून निघाले, तोच बाबा थोडे मोठ्या आवाजात म्हणाले, "मेरा एक रुपिया बाकी है, मुझे शिरडी आकर दे जाना." एवढं बोलून श्रीबाबांची पांढरे वस्त्रधारी आकृती पूर्ववत पुसट होत चालली आणि शेवटी दिसेनाशी झाली.

श्री कस्तुरी ह्यांनी थोड्या वेळातच स्कुटर थांबवली. रात्रीच्या थंड वातारणात सुद्धा त्यांना खूप घाम आला होता. ते आपल्या पत्नीला म्हणाले, "कुणाला सांगूनही खरं वाटणार नाही, पण आज आपल्याला बाबांनी प्रत्यक्ष दर्शन दिलं, आपण त्यांचे पाय धरायला हवे होते, आपली फार मोठी चूक झाली." पश्चात्तापाने श्री कस्तुरी ह्यांच्या अंतरमनाला वाचा फुटली! अनुतप्त मन पुनीत होऊन बोलू लागलं...!

बाबा! आम्ही कायम म्हणत असतो की आम्ही तुझी भक्ती करतो आणि दाखवत असतो की आम्ही तुझी भक्ती करत आहोत; तरीही वास्तविकता मात्र निराळी आहे. बाबा! खरं पहाता आम्ही भक्ती करतच नसतो! तुझ्याकडे बघण्याचं आम्ही ढोंग करून बघत असतो कुठल्यातरी तुच्छ वस्तुकडे, केवळ भौतिक सुखाकडे, आणि त्यामुळे अज्ञानाच्या निबीड अंधकारात आम्ही भटकत असतो. ईश्वरा! दीनदयाळा! साईनाथा! जर आम्ही खऱ्या मनानं तुझ्यावर प्रेम केलं, तुझच होऊन रहाण्याचा जर आम्ही प्रयत्न केला, अनन्यभावे तुझ्या चरणी येऊन आम्ही आम्हाला तुझ्या हाती सोपवून जर दिलं; तर जगातली कुठलीही अशी शक्ति नाही जी आम्हाला तुझ्यापासून विन्मूख करू शकेल. मग तुझ्या अमोघ अशा कृपास्पर्शाने आमच्या जीवनातील अज्ञानानं निर्माण केलेली ही माया नष्ट होऊ शकेल. इंद्रीय दृष्टी नष्ट होऊ शकेल. मग स्वस्वरूप स्थितीत शुद्ध, मुक्त होऊन केवळ तुझ्याच हातातील एक साधन होऊन परम् लक्ष्याकडे वाटचाल सहज होऊ शकेल."

त्या पतीपत्नींची श्रद्धा साईठायी अधिक दृढ झाली. कारण सर्वव्यापी श्रीसाई भगवानचा लोकविलक्षण चमत्कार आज त्यांना प्रत्यक्ष नजरेनं पहाण्याचं सौभाग्य लाभलं होतं!!

जो जो मज भजे जैशा जैशा भावे।
तैसा तैसा पावे मीही त्यासी॥

# शिरडी वृत्त माहे — जून १९८६

जून महिन्यामध्ये बाहेरगावांहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी पुष्कळ प्रमाणात होती. श्री साईबाबांचे दर्शनासाठी साईभक्तांची तसेच पंढरपूर यात्रेला जाणारे साईभक्तांची खुपच गर्दी झाली होती.

काही कलाकारांनी श्रींच्यापुढे हजेरी दिली ती खालील प्रमाणेः

**कीर्तन** — १) ह.भ.प. मधुकर गणेश सूर्यवंशी, संस्थान गवई —कीर्तनकार-प्रवचनकार यांची कीर्तने एकादशी व महत्त्वाचे दिवशी झाली.
२) ह.भ.प. विश्वनाथ महाराज सुराळेकर, ता. वैजापूर.

**प्रवचन** — १) ह.भ.प. श्री. लक्ष्मण महाराज वाकचौरे, शिर्डी.

**भजन गायन** — १) जयवंतराव कुळकर्णी, मुंबई २) श्री. तपल, मुंबई ३) श्री. शरदराव गाळवणकर, मुंबई ४) श्री. विरकुमार शहा, मुंबई ५) श्री. सुबाश पोगम ६) श्री. सुनील देसाई, मुंबई ७) राम दिक्षीत, डोंबिवली ८) श्रीमती मालती सुमंत, बैरागपूर ९) सुजाता सुमंत १०) श्र. अनिलशेठ, दिल्ली ११) सौ. आसावरी वायकुळ, घाटकोपर १२) श्री. विलास वायकुळ १३) श्री. निनाद वायकुळ १४) रमेश नागपाल, गोरखपुर १५) श्री. राजेश नागजी, नासिक १६) श्री. रमेश दुबे, इंदोर १७) डॉ. बी. चंदर, दिल्ली १८) श्री. एम. एस. नारायण आचारी, भोपाळ १९) श्री. टी. नरसिंह, जग्गीयापेठ २०) श्री. रंगनाथ शंकर सस्तूर, संगमनेर २१) श्री. गुलाब महादेव घाटबिसावे, मुंबई २२) श्री. जयवंत सदाशिवराव डबली, छिंदवाडा २३) कु. भारती नायडू, धमतरी २४) श्री. संजय भोसले २६) श्री. देवेंद्र चंद्रकांत देवळणकर, पुणे २६) श्री. जितेंद्र गंगाधर जाधव, पुणे २७) श्री. राजेंद्र गंगाधर जाधव २८) श्री. एस. के. सक्सेना, दिल्ली २९) श्री. सी. आर. जाधव, सोलापूर.

**हवापाणी** — शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. पावसाला सुरुवात झालेली आहे. परंतु अगदी कमी प्रमाणात पाऊस पडला.

## साई छायाचित्रांचे छानदार प्रदर्शन

साईभक्त छायाचित्रकार श्री. शंकरराव खोपकर यांनी टिपलेल्या शिरडीतील श्री साईबाबांच्या विविध उत्सवांचे, स्थळांचे सुंदर प्रेक्षणीय असे प्रदर्शन समाधी मंदिर, वरील सभागृहात गुरुपौर्णिमा उत्सव प्रसंगी भरविण्यात आले होते. या प्रदर्शनाचे उद्घाटन श्री. एस. आर. शिंदे, विश्वस्त सदस्य, श्री. साईबाबा संस्थान शिर्डी यांनी केले. शेकडो साईभक्तांनी प्रदर्शनास भेट देऊन छायाचित्रकारांचे कौतुक केले.

# श्री साईबाबा संस्थान, शिरडी
## श्री साईबाबा संस्थान प्रकाशित पुस्तकांची यादी

| अनु. पुस्तकाचे नांव | भाषा | किंमत | पॅकिंग व पोस्टेज |
|---|---|---|---|
| १. श्री साई चरित्र | मराठी | ३४-५० | ६-०० |
| २. —"— | इंग्रजी | २०-०० | ४-२५ |
| ३. —"— | हिन्दी | १६-०० | ४-२५ |
| ४. —"— | कन्नड | १०-०० | ४-०० |
| ५. —"— | तेलगू | १४-५० | ५-२५ |
| ६. —"— | तामीळ | १२-०० | ४-५० |
| ७. —"— | सिंधी | २२-०० | ४-५० |
| ८. गुजराथी पोथी | गुजराथी | ३१-०० | ६-०० |
| ९. श्री साईलिलामृत | मराठी | ७-५० | ४-०० |
| १०. —"— | गुजराथी | ४-२५ | ४-०० |
| ११. अवतार व कार्य | मराठी | ६-५० | ४-०० |
| १२. स्तवन मंजिरी | मराठी | ०-३० | ३-५० |
| १३. —"— | गुजराथी | ०-३० | ३-५० |
| १४. सगूणोपासना | मराठी | ०-७० | ३-५० |
| १५. चार अध्याय | मराठी | १-२५ | ३-५० |
| १६. सगूणोपासना | सिंधी | १-२५ | ३-५० |
| १७. सचित्र साईबाबा | इंग्रजी | ३-४० | ३-५० |
| १८. मुलांचे साईबाबा | मराठी | १-५० | ३-५० |
| १९. —"— | इंग्रजी | २-०० | ३-५० |
| २०. —"— | तेलगू | २-५० | ३-५० |
| २१. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २२. गाईड टू होली शिरडी | इंग्रजी | १-५० | ३-५० |
| २३. —"— | मराठी | १-५० | ३-५० |
| २४. —"— | गुजराथी | १-५० | ३-५० |
| २५. तेलगु पुजाविधी | तेलगु | — | — |
| २६. रूद्राध्याय | मराठी | ०-९० | ३-५० |
| २७. साईबाबा ऑफ शिरडी बाय प्रधान | इंग्रजी | ३-०० | ३-५० |
| २८. साईबाबा ऑफ शिरडी वाय. पी. भरूचा | इंग्रजी | ६-५० | ४-०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence to Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

# श्री साईबाबा संस्थान शिरडी
## फोटोंची यादी

| अनु. | फोटोचे नांव | साईज | किंमत | पोस्टेज व पॅकिंग |
|---|---|---|---|---|
| १. | आशिर्वाद फोटो | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| २. | –"– | १०" × १४" | १-१५ | ३-५० |
| ३. | –"– | १०" × १२" | १-५० | ३-५० |
| ४. | –"– | ७" × २०" | ०-६० | ३-५० |
| ५. | –"– | ५½" × ६½" | ०-३५ | ३-५० |
| ६. | –"– | ४" × ५" | ०-३० | ३-५० |
| ७. | –"– | २" × ३" | ०-२० | ३-५० |
| ८. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | १४" × २०" | १-८५ | ३-५० |
| ९. | " " (काळापांढरा) | १४" × २०" | ०-८५ | ३-५० |
| १०. | दगडावर बसलेले साईबाबा (रंगीत) | ३½" × ५½" | ०-६० | ३-५० |
| ११. | द्वारकामाई (रंगीत) | १७" × २२" | ५-७५ | ३-५० |
| १२. | –"– | १४" × २०" | १-६० | ३-५० |
| १३. | –"– | १०" × १४" | १-२५ | ३-५० |
| १४. | समाधी फोटो | १३" × ९" | १-१५ | ३-५० |
| १५. | –"– | ८" × ६" | ०-७५ | ३-५० |
| १६. | –"– | ४" × २½" | ०-१० | ३-५० |
| १७. | कॅमेरा फोटो (रंगीत) | ९" × १२" | १-६५ | ३-५० |
| १८. | ऑफसेट फोटो | ९" × १३" | १-५० | ३-५० |
| १९. | –"– | ५" × ७" | ०-४० | ३-५० |
| २०. | दगडावर बसलेले बाबा (निळा) | ९" × १२" | ०-७५ | ३-५० |
| २१. | मूर्ती फोटो (बुस्ट) | ३¾ × ४½" | ०-३५ | ३-५० |

मुद्रक : श्री.एम.डी. राजन, गीता ऑफसेट, बी-२३ रॉयल इंडस्ट्रियल इस्टेट, नायगांव क्रॉस रोड, वडाळा, मुंबई ४०० ०३१.
**संपादक व प्रकाशक** :श्री.रा.द. बन्ने, साई निकेतन

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान शिर्डीचे अधिकृत मा



श्रीसाईलीला
सप्टेंबर १९८६

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान.
शिरडीचे अधिकृत मासिक

संपादक

**श्री. रा. द. बन्ने**

कार्यकारी अधिकारी श्रीसाईबाबा संस्थान शिरडी

: कार्यकारी संपादक :

**प्रा. सौ. इंदिरा खेर**
एम.ए. पी.एच.डी.
(इंग्रजी आवृत्ती)

**श्री. सदानंद चेंदवणकर**
(मराठी आवृत्ती)

---

-वर्ष ६५ वे] किंमत एक रुपया [अंक ६ वा

दूरध्वनीः ४१२ २५ ६१

---

: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं ८०४ बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख. सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

श्री साईबाबांच्या संदेशाचा जगभर प्रसार करणे हे
श्री साईलीलाचे मुख्य उद्दिष्ट आहे.



# श्री साई वाक्सुधा

"पाप जयांचे विलया गेलें।
ऐसे जे पुण्यात्मे वहिले।
तेचि माझे भजनी लागले।
खूण लाधले ते माझी॥ ११॥
"साई साई" नित्य म्हणाल।
सात समुद्र करीन न्याहाल।
या बोला विश्वास ठेवाल।
पावाल कल्याण निश्चयें॥ १२॥
न लगे मज पूजासंभार।
षोडश वा अष्टोपचार।
जेथें भाव अपरंपार।
मजला भार ते ठायीं॥ १३॥
ऐसे बाबा वेळो वेळां।
बोलूनि गेले भक्तजिव्हाळा।
आतां आठवूनि त्या प्रेमळ बोला।
करूं विरंगुळा मनासी॥ १४॥
ऐसा हा दयाळू साईसखा।
शरणागतांचा पाठिराखा।
भक्त कैवार घेऊनि निका।
नवल विलोका केलें तें॥ १५॥

— श्री साईसच्चरित् अध्याय १३

# सुविचार

ऐश्वर्यस्य विभूषणं सुजनता
शौर्यस्य वाक् संयमो।
ज्ञानस्योपशमः शमस्य विनयो
वित्तस्य पात्रे व्ययः॥
अक्रोधस्त पसः क्षमा।
प्रभवितु धर्मस्य निर्व्याजता।
सर्वेषामपि सर्वकारणमिदं।
शीलं परं भूषणम्॥

* — भर्तृहरि

★

सौजन्य हे संपत्तीचे, वाणीवरील संयम हे शौर्याचे, इंद्रियनिग्रह हे ज्ञानाचे, नम्रपणा हे क्षमाचे, योग्य ठिकाणी खर्च हे धनाचे, न रागावणे हे तपश्चर्येचे, क्षमा हे बलवानाचे व निष्कपटीपणा हे धर्माचे भूषण आहे परंतु या सर्व गोष्टींचे कारण जे शील हे सर्वात मोठे भूषण आहे.

या मासिकात प्रकाशित झालेल्या
लेखातील मतांशी संपादक
सहमत आहेतच असे नाही.


## अनुक्रमणिका



| क्रमांक | लेख-कविता शिर्षक | लेखक-कवि नाव | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|
| १ | संपादकीय | — | ४ |
| २ | साईमंत्र | — श्री. शशांक मांजरेकर | ५ |
| ३ | सत् चिन्तन | — श्री. प्रभाकर कोळमकर | ६ |
| ४ | काया ती निवाली दर्शनमात्रे | — श्री. अनिल आजगांवकर | ९ |
| ५ | श्री समर्थ सद्गुरु चिले महाराज | — श्री. बाळासाहेब नाडकर्णी | १० |
| ६ | संभ्रम | — श्रीमती शहाणे | १२ |
| ७ | श्री साईनाथांचा शरणार्थी (१६) | — श्री. विश्वास खेर | १३ |
| ८ | गुरुमहती | — सौ. उषा अधिकारी | १७ |
| ९ | साईनाथ माझे गुरु | — डॉ. सुनंदा कुलकर्णी | १९ |
| १० | साई भक्त श्री. म्हाळसापती | | २० |
| ११ | साई तुला नजर लागते | — सौ. चंद्रप्रभा स्वामी | ३० |
| १२ | भेटी लागी जीवा | | ३१ |
| १३ | साई | — कु. सुहास सावंत | ३१ |
| १४ | श्री साईबाबा आणि श्री वासुदेवानंद टेंबे स्वामी महाराज | — श्री. दिपक धुरी | ३२ |
| १५ | श्रद्धा | — सौ. रेखा माहीमकर | ३५ |
| १६ | खापर्डे यांची शिरडीदैनंदिनी | — साईनंद | ३६ |
| १७ | साईलीलाचे ६५ व्या वर्षात पदार्पण | — सौ. सरोजिनी मुळये | ३८ |
| १८ | संतांची एकात्मतेची शिकवण | — श्री. सुनील राणे | ४० |
| १९ | हरीला बांधारे प्रेमानी | — श्रीमती लीला बाबरे | ४१ |
| २० | श्रीगणेशोत्सव बाल साई भक्तांसाठी | | ४२ |
| २१ | श्री गुरुवेनम : | — सौ. मंगला वैद्य | ४४ |
| २२ | शोध — श्री साई कृष्णाचा | — श्री. चकोर आजगांवकर | ४५ |
| २३ | देवाधिदेव साईदेव यांची थोरवी | — श्री. हुद्दार गुंडूराव | ४७ |
| २४ | प्रखर राष्ट्रनिष्ठेचा आदर्श श्री संत पाचलेगावकर महाराज | | ४९ |
| २५ | तुच कर्ता आणि करविता | — सौ. चेतना मेस्त्री | ५० |
| २६ | श्री साईबाबांचे अलौकीक सामर्थ्य | — श्री. नंदू पाटील | ५१ |
| २७ | कबीर : सद्गुरुचा महिमा | — श्री. य. न. पंडित | ५२ |
| २८ | कलियुगीन परब्रह्म श्री संत साईबाबा | — श्री. कृ. भा. देशमुख | ५४ |
| २९ | श्री साईनाथ प्रसन्न | — श्री. घोरपडे | ५६ |
| ३० | बाबा माझे माता पिता | — सौ. दिपा स. आळवेकर | ५७ |
| ३१ | प्यारे साईबाबा हमे आशिर्वाद दो | — श्री. भा. अ. बेलेकर | ५८ |
| ३२ | बाबांनी मुलाला पुनर्जन्म दिला | — श्री. लक्ष्मण धुरी | ६० |
| ३३ | साई भक्ती | — सौ. सुधाताई चैतन्य | ६१ |
| ३४ | श्री विठ्ठल दर्शन | — सौ. निर्मला मालवणकर | ६२ |
| ३५ | श्री साई साक्षात्कार | — श्री. सदानंद वाईरकर | ६४ |

# श्री बाबांच्या चरणी लागा, पण..

## संपादकीय



साईभक्तांनो, तुम्ही सर्वच्या सर्व संतचूडामणी भगवान श्री साईनाथांचे पूजन-अर्चन-भजन-चिंतन-मनन नित्य नेमाने करीत असतां होय ना? सकाळीच पूजेच्या वेळी तुमच्या घरातील श्री बाबांच्या तसबिरीला बाबांच्या भालप्रदेशी दुबोटी अष्टगंध ओढतांना किंवा कुंकुम तिलक लावतांना पुष्पमाला घालताना नि प्रणाम करतांना एक प्रकारचा अवर्णनीय आनंद हर एक भक्तास होत असतो. श्री बाबांचे भजन करायला भक्तमंडळी बसली की भजनाला अल्पावधीतच रंग चढला म्हणून समजा! भक्त मंडळींच्या बैठकीत बाबांच्या संबंधीच्या गप्पागोष्टी निघाल्या की त्या संपता संपत नाहीत. बाबांच्या महानिर्वाणाला आता ६८ वर्षे झाली तरी त्यांचे विस्मरण भक्तांना अजिबात झालेले नाही, अजिबात नाहीच. त्यांच्या आठवणी आणि आख्यायिका अजुनही ताज्याच वाटतात. त्या ऐकण्यात नि सांगण्यात एक प्रकारची अवीट गोडी वाटते. गुरुवार-शुक्रवार हे तर खास बाबांचे दिवस. त्यादिवशी तुम्ही कदाचित उपास करीत असाल पण बाबांना उपास करणे पसंतच नव्हते म्हणा! तुम्ही रात्री आरती करून उद पेटवीत असाल. रामनवमी, गुरुपौर्णिमा, विजयादशमी या बाबांच्या उत्सव प्रसंगी तुम्ही कदाचित् शिरडीची वारी करीत असाल. शिर्डी वारीत तुम्ही गुरुस्थानातील भक्तमेघाने स्थापन केलेल्या शाळुंकेसहित शिवलिंगाचे दर्शन घेऊन त्या समोरच्या साईप्रतिमेस वंदन करून जवळच्याच कडूलिंबाच्या झाडाच्या बुंध्याला नमन करून काहीतरी पुटपुटत गुणगुणत असाल, म्हणजेच पर्यायाने बाबांच्या ठायी आपला मनोदय प्रगट करीत असाल. गुरुस्थानाला तुम्ही फेऱ्या कां घालतां? त्यापाठीमागे काहीतरी भूमिका, ठाम भावना आहेच ना!

गुरु स्थानानंतर समाधी मंदिरात गेल्यावर तुम्ही श्रींच्या पार्थिव समाधीचे, लगतच्याच मनोहारी मुर्तीचे दर्शन घेऊन कृतकृत्य झाल्याचे समाधान मानत असाल समाधीवर फुलांची चादर व मूर्तीला स्वहस्ते पुष्पहार घालून श्रीचरणांचे चुंबनही घेत असाल, वा बाबांच्या दाढीला, हनुवटीला हस्त स्पर्श करून परततांना तुमच्या नेत्रातून आसूधारा पण वाहिल्या असतील.

पुढे द्वारकामाईत जाऊन बाबांनी स्वहस्ते पेटविलेल्या धुनीला वंदन करून तिच्याच समोरच्या चित्रकार जयकरांनी चितारलेल्या बाबांच्या अगदी हुबेहूब प्रतिमेचे दर्शन घेऊन धन्यधन्य झाल्याचे समाधान तुम्हाला खासच झाले असणार. या मशिदमाईतील ज्या शिलेवर श्री एक पाय खाली ठेऊन दुसरा पाय पहिल्या पायाच्या गुडघ्यावर ठेऊन बसत असत त्या शिलेवर नतमस्तक होऊन तुम्ही काहीतरी कथन करीत असाल पुढे चावडीतील बाबांच्या पुष्पमालांनी सालंकृत अशा गादीवरील प्रतिमेचे दर्शन करून शिर्डी

वारी अशी तुम्ही पूर्ण करीत असाल होय हे अगदी खरे ना!

साईभक्तांनो, तुम्ही हे सारे सारे सोपस्कार करता, बाबांच्या वरील आपल्या भक्तीची भावना व्यक्त करता, तुम्ही हे सारे अनन्यभावे करता येथपर्यंत हे सारे ठीक आहे. पण हे सारं करण्यात तुमची काहीतरी अपेक्षा असते होय ना! तुमचे काहीतरी इच्छित असते. बाबांच्या माध्यमाने आपले इच्छित कार्य सुकर व्हावे, मार्गी लावावे, यशस्वी व्हावे, लाभावे अशी अंदरकी बात असते.

पण साईभक्तांनो, बाबांकडे आपला फायदा, आपला स्वार्थ साध्य करून घेण्यासाठी जाण्याची आवश्यकता नाही. बाबा हे स्वावलंबी आहेत व ते अंतर्ज्ञानी आहेत. आपला प्रत्येक भक्त आपल्याकडे कशासाठी आलाय हे ते अगदी बरोबर, अचूक ओळखतात. तुमच्या कथा, तुमच्या व्यथा, तुमची रडगाणी बाबांना ऐकवणे, सांगणे व त्यातून मुक्त कर म्हणून त्यांचेकडे साकडे घालणे अगदी अयोग्य आहे. श्रीभगवान साई हे शंभरटक्के क्षमाशिल दैवत आहे. तुम्ही त्यांना कळवळून मनापासून नमस्कार करा, आर्त स्वराने पुकारा ही साईमाऊली तुमचे सहस्त्र अपराध अक्षरशः पोटात घालून तुमचेवर अखंड कृपेचा वर्षाव करीत राहील.

पण हे केव्हा शक्य आहे? तुम्ही शंभरटक्के निरपेक्ष भावनेने श्री साईनाथांना पुन्हा पुन्हा वंदन करा, निरिच्छ भावनेने तुम्ही साईबाबांकडे पहा, त्यांचे डोळे भरभरून दर्शन सुख घ्या, कोणत्याही प्रकारची अपेक्षा, इच्छा न बाळगता तुम्ही बाबांकडे जा-या थोडक्यात त्यांच्याकडे काही एक मागणी करू नकात. यातच शंभरटक्के तुमचे हीत आहे असे मनोमन ठामपणे समजाच समजा.

# साईमंत्र

साईमंत्र आहे विश्वात महान
त्यामुळे संकटे पळती माघार
श्रद्धा आणि सबुरी या दोन शब्दात
असे यांच्या शक्ती महान
साईची मर्जी असे साऱ्या विश्वात
केवळ उदीने करी मोठ्या रोगावर निदान
सर्व विद्येत असे यांचे प्राविण्य
भल्या भल्या विद्वानांची मती करी गुंग
अशा साई गुरुची लागली आस
भुक, तहान विसरूनी झालो यांचा दास

**— श्री. शशांक लहू मांजरेकर**
३/२३ रामचंद्र भवन, फुले रोड,
डोंबिवली (पश्चिम), जिल्हा - ठाणे.

# ॥ सत् चिन्तन ॥

— श्री. प्रभाकर कोळमकर
बी.ए.बी.एड.,एल्.एल.बी.
१९/क, गुंफादर्शन, कार्टर रोड - १,
बोरिवली (पूर्व), मुं - ६६.

श्रीसमर्थ रामदास, अक्कलकोट निवासी श्री स्वामी समर्थ, शेगांव निवासी श्री गजानन महाराज, शिर्डी निवासी श्री साईबाबा इत्यादि संतांचे सतत स्मरण म्हणजे पूर्वायुष्यात जन्मांच्या पुण्यकर्मांचेच फळ होय. संत निर्विकार मनाचे, मनोज्ञ आविष्काराचे महापुरुष असून मनाची चरित्रे, अनुभव-कथा, काव्ये मानवी मनाला मार्ग दाखवितात. सत्य मार्गदर्शन करतात आणि अफाट जगाचा व्यवहारी बाजार पूर्ण मायावी आहे याची खात्री पटते. आपले मन, अंतर्मनातील अंतरंग या दृश्य मायावी मायेच्या मोहाने तडफडत असते. संत-परमेश्वराचे दृश्य रूपच! -भक्तांची उलट तपासणी परीक्षा घेत असतात. मनाच्या अवस्थेला स्थिर करून स्थैर्य देत असतात. स्वैर मनाला संयम शिकवितात. मनाला, देहाला चटके देणारा अनुभवही देतात.

आपल्यावर प्रेम करणारी, सोबत करणारी माणसे स्वार्थाने उलटतात अशा वेळी भ्रम पडतो आपण संभ्रमात गुंतून जातो. श्री संतांचे स्मरण, मानस-पूजन अविरत चालू असले तरी बाह्य जगाचे टोले-टक्के-टोमणे सहन करावेच लागतात. अशावेळी मानवी मनाला उद्धरणारा संत परमेश्वर कोठेतरी लपून आहे, गंमत बघतो आहे असेच वाटते. 'मन ऐसे व्हावे, तेणे जग बोलणे सोसावे...' अशा संत-वाणीची आठवण येते.

शेगावचे संत श्री गजानन महाराज, शिर्डीचे श्री साईबाबा, सज्जनगडचे श्री स्वामी समर्थ नावे, स्थळे, काळ वेगवेगळे पण कार्य तत्त्व-दिशा एकच. मानवाच्या मलीन मनाचा उद्धार करणे!

आपण अभिमान बाळगतो. पदवी, विद्वत्तेचा! पैशाचा- श्रीमंतीचा! इ. इ. सर्व वृथा अभिमान! हा अभिमान, गर्विष्ठता श्री संत-चरणी अर्पण केल्यास मनः शांती लाभते. सुख अपार मिळते. अधिकार-सत्तेची भावना बाळगल्याने अहंकार बळावतो. त्यामुळे नको असणाऱ्या चुका घडतात. लोक 'फजिती पाहतात. सर्वसाक्षी दयाळू भगवंताच्या पायी लीन, दीन होवू या -

'महापुरे झाडे जाती, तेथे लव्हाळी वाचती...' अशा उच्च, श्रेष्ठ महानुभवाचा अनुभव घडावा. कुंभार पायाने माती तुडवतो. पण त्याच मातीशी मन-मनाने एकरूप होतो आणि कलापूर्ण सुंदर घडा बनवितो. परमेश्वर ज्याला संतांनी चराचरी (दृश्य-अदृश्य) पाहिला तो सुद्धा महान कुंभारच! भक्ताचे प्रेम, भक्ती दृढ आहे का हे यथेच्छ बडवून पाहतो. भक्ताचे नाते अतूट आहे ते पाहतो, भक्त ध्रुवासारखा अढळ, नामदेवासारखा प्रेमळ आहे हे त्याला पटले की प्रसन्न होतो. अमाप शांती-सुख चैतन्यमापानी देतो.

प्रपंचात गुरफटलेली मने नेहमीच भरकटत असतात. त्यांना इच्छा, कल्पनांचे मनोरथ असतात. ते निष्फळ झाले की नैराश्य येते.

निराशेने मन खचून जाते. संतांनी त्यावर उपाय सांगितला. मन निरिच्छ करा. मग मन निराश कसे होणार? एकच इच्छा धरा त्या दयाघन करुणाकर ईश्वर चरणांची! दृढ इच्छा धरा! ते सद्गुरू चरण म्हणजेच मानवी-मनोरथांना चालना देणारे चैतन्य होय!

शुद्ध चित्त हेच खरे-ईश्वराने निर्मिलेल्या मानवी-शरीरातील परमेश्वराचे घर होय. ईश्वराला पाहण्याचा अभ्यास-ध्यास-करायला शिका. मन शुद्ध ठेवा. ईश्वर आपसूक प्रवेशतो. संत-चरित्राच्या अभ्यास-वाचनाने प्रेम भक्ती-भावना फुलारतात. मनावर उच्च संस्कार घडतात. ओम् बीज मंत्राचा साक्षात्कार घडतो. बीजातून विश्व, विश्वातून बीज यांची अनुभूती अनुभवतो. आत्मज्ञानातून विश्वाचे ज्ञान मिळते.

प्रत्येक वस्तूमात्रात ईश्वर आहे. फक्त रूप, आकार वेगवेगळा. संत ज्ञानेश्वर ईश्वराशी एकरूप झाले होते. त्या प्रेमामुळेच ईश्वराने भिंतीत चैतन्य निर्माण केले. रेड्याच्या तोंडातून वेद वदविले. भक्त प्रल्हादाच्या प्रेमापायी ईश्वराला 'नरसिंह' रूपाने खांबातून प्रगट व्हावे लागले. गुरू हे सुद्धा ईश्वररूपच होय. ईश्वर म्हणजेच गुरू रूप होय. गुरुपायी अमर्याद भक्ती-प्रेमामुळेच एकलव्याला अपूर्व धनुर्विद्या प्राप्त झाली. 'मागे-पुढे उभा सांभाळी हा....' अशी अवस्था येते.

सृष्टीतले अपूर्व सौंदर्य भगवंताचे दर्शन घडविते. फुलांचे आकर्षक रंग, आकाशाची रंगीत विशालता, डोंगर-दऱ्यांची भव्यता, सागराची अमर्याद चंचलता, वृक्षांची सावली, जमिनीतील तृणांकूर इत्यादि सृष्टीतील दगड-माती-पाण्यात ईश्वराचे रूप ओळखायचा अभ्यास-छंद हवा. आवड हवी.

मुंगी, माशी, चिमणी, लहानगा कीडा आपणाला दिसतो. आपणाजवळ येतो. तो पूर्व सकेतानेच. ईश्वरी प्रेरणेनेच! हे ओळखायला शिकले म्हणजे ईश्वराचे अस्तित्व पटते. ईश्वर-रूप-ज्ञान प्राप्त होते. सर्वभूती भगवंत पाहण्याची कला-शक्ती-कुवत संतांमध्ये असते म्हणूनच संत म्हणतात,

'जे जे भेट भूत, ते ते जाणा भगवंत.....'

तर्खड बाई पंचपक्वानाचे ताट घेऊन श्रीबाबांच्या मशिदीत जात असतात. वाटेत त्यांना भुकेलेले डुकर दिसते. बाई त्याला नैवेद्य ताटातील भाकर खावू घालतात आणि मशिदीतील 'साईश्वर' तृप्तीचा ढेकर देतो. बाईंना याची काहीच कल्पना नसते. बाबांपुढे त्या नैवद्याचे ताट ठेवतात. बाबा हसतात व म्हणतात, "आई, मला नैवद्य पावला. येतेवेळी तू डुकराला भाकर दिलीस. मी तृप्त झालो. तू मला ओळखले नाहीस. पण तुझ्यातील ही दयाबुद्धी जागृत ठेव. ईश्वर तुझे कल्याण करील....'

आत्मा तृप्त असेल तरच सद्गुरुची भेट होत असते. सद्गुरू स्वतःच भक्ताकडे भेटीला येत असतो.

ईश्वराला ओळखायला आत्मा तृप्त पाहिजे. सद्गुरुची साथ पाहिजे. चौघेजण ईश्वराला शोधायला-भेटायला-निबिड अरण्यात शिरतात. उन्हाच्या तापाने थकतात, तृषार्त होतात. त्या चौघात श्रीबाबाही असतात. एक वंजारी त्या चौघांना भेटतो. प्रेमाने चौकशी करतो. झोपडीत येऊन भाकर-तुकडा खावून विश्रांती घेण्यास विनवितो. वाटाड्या घेण्यास

विनवितो. परंतु या उपदेशाला चौघेही नकार देतात. पुन्हा काही वेळाने तोच वंजारी त्यांना भेटतो. वंजारी त्यांना पुन्हा भाकर-तुकडा खावून विश्रांती घेण्यास सांगतो. यावेळी मात्र श्रीबाबा त्याचे ऐकतात. त्याच्या झोपडीत भाकर खातात. बाकीचे तिघेजण त्या वंजाऱ्याची विनंती धुडकावून त्या निबिड अरण्यात शिरतात. वंजारी बाबांना भाकर देतो, पाणी देतो. बाबांचे सारे मन-शरीर चैतन्याने भरून जाते. तो वंजारी म्हणजे प्रत्यक्ष सद्‍गुरूच असतात. श्रीबाबांना-सच्च्या सत् शिष्याला-सत् गुरुचे दर्शन झाले. श्रीबाबांना त्या सद्‍गुरूमुळेच 'परमेश्वराचे' दर्शन झाले. श्रद्धा आणि सबुरीचे महत्त्व पटले. अंगी बाणवले.

श्री समर्थ रामदास म्हणतात,

'मना त्वाचि रे पूर्व संचित केले, तया सारिखे भोगणे प्राप्त झाले......'

जे मन शुद्ध असते, ते मन सद्‍गुरू बनते. संत कबीर म्हणतात, 'शरीराला कोठे ही भरकटू द्या. पण मन ताब्यात ठेवा...' श्रीकृष्णाने अर्जुनाच्या मनाचेच 'सारथ्य' केले. मनाचे सामर्थ्य वाढविले. मार्गदर्शन केले. काका, मामा, भाऊ इत्यादि नात्यागोत्याच्या मोहबंधातून अर्जुनाला मुक्त केले. मुक्त मन हेच खरे वैराग्य! या वैराग्यातूनच परमेश्वराचे रूप दर्शन घडत असते. परमेश्वराचे 'विश्व-रूप' पाहण्यास सामर्थ्य मिळते. प्रपंचात आपण निमित्त असतो. कर्ता करविता तो नट-नाटकी विश्वेश्वरच असतो. कर्तेपणाचा अहंकार बाळगू नका. या अहंकारामुळेच मनाला सर्व व्याधी जडतात. मनाचे सामर्थ्य-एकाग्रता कमी होते. मन दुर्बळ होत असते. दुर्बळ मनाला ईश्वराचे रूप,भान कळत नाही.

प्रत्येक कृती, उपचार, विकार, विचार ईश्वराला अर्पण करावा. यामुळे मानसिक स्थैर्य, समाधान मिळते. ईश्वराचा सहवास घडतो. वाणी-वाचा शुद्ध राहते. मनाचे बळ वाढते, संयमता, शांतता लाभते. शब्दांचे बळ वाढते. म्हणूनच आध्यात्मात नामोच्चाराला, नाम स्मरणाला महत्व मिळालेले आहे. नाम-भक्ती-प्रेम परमेश्वराच्या जवळ नेणारी एक शक्ती आहे. नाम-साधना ईश्वराचे सामर्थ्य ओळखायला शिकविते. नामाच्या सतत ध्यासाने अभ्यासाने अंतर्मनात आपोआप सतत ईश्वराचे नामस्मरण-उच्चारण घडत असते. अंतरंगातील सतत नामस्मरणानेच अनेक कठीण प्रसंगात धैर्य मिळत असते. "गण गण गणात बो ते...' या श्री गजाननाच्या नामस्मरणानेच शेगावी श्री गजानन महाराज सर्व विश्वाचे थोर योगेश्वर बनले. ईश्वरमय झाले. 'नामातील' स्वर, लय, उच्चार, रूप , आकार ईश्वरमय करीत असते. 'नामा'तील तन्मयता, एकरूपता, एकाग्रता, ईश्वराचेच रूप होय. श्री सन्त गाडगेबाबांना या 'नाम' गोडी मुळेच प्रखर वैराग्य मिळाले. बहुजन हिताचा संसार मांडला. बायको-मुलांचा प्रपंच ईश्वराकडे सोपविला.

आमच्या घरी सर्वांनाच श्री साईभक्तीची आवड आहे. बाबांच्या फोटो समोर माझी पत्नी, मुले दिवा, अगरबत्ती करतात. आणि यामुळेच अनेक विचित्र प्रसंगातून श्रीबाबा आम्हा सर्वांचे रक्षण करतात. सांभाळ करतात.

१९८२-८३ सालातील घटना. आमच्या इमारती शेजारी सुरुंगाने रस्ता फोडण्याचे काम जोरात चालले होते. त्या वेळी भयानक स्फोट झाला व सुमारे ५० ते ७० किलो वजनाचा एक मोठा दगड चौथ्या माळ्यावरील गच्चीत येऊन पडला. गच्चीत

एक मोठा खळगा तयार झाला. बैठ्या घरांची कौले फुटली. तो दगड केवळ १० फूट कमी उंचीने उडाला असता तर आमच्या घरातील टी.व्ही., काच सामान, शोकेस इ. सामान तर उध्वस्त झालेच असते पण आणखीही काही भयानक प्रकार घडले असते! पण... श्री सद्गुरू साईनाथांनी आम्हा सर्वांचे रक्षण केले. आम्हा सर्वांना सांभाळले.

दि. १५ जुलै ८५ ची घटना. सोमवारी सकाळी ७ च्या दरम्यान घटना घडली. माझी पत्नी स्टोव्ह वरील टोपात फोडणी टाकीत असता टोप उलटला. स्टोव्ह भडकला. उपडा पडला. तेल सांडले. जळत गेले. पत्नीच्या तोंडावर उजव्या बाजूस तेल उडाले. फोड आले. घरात फक्त दोन मुली होत्या. त्या फारच घाबरल्या. पण त्या दयाळू सद्गुरू साईनाथांनी आम्हा सर्वांना सांभाळले. पत्नीच्या डोळ्यांना इजा झाली नाही. १/२ केस जळले. पण नंतर आपोआप स्टोव्ह विझला. जमिनीवरील पेटते तेल आपोआप विझले. पत्नीच्या हातावर फोड आले. डॉक्टर १०-३० च्या दरम्यान आले. ११.३० च्या दरम्यान शिर्डीहून श्रीबाबांचा ऊदी प्रसाद आला. नंतर दुसऱ्या दिवशी मंगळवारी सकाळी श्री साईभक्त विजय हजारे शिर्डीचा ऊदी प्रसाद घेऊन आले. आता तिच्या चेहऱ्यावर भाजल्याच्या खुणाही दिसत नाहीत. श्रीबाबाच भक्तांचा सांभाळ सर्वकाळ, सर्वत्र करीत असतात. आम्हा सर्वांचे रक्षण श्रीबाबा सर्वकाळ सर्वत्र करीत आहेत, हीच आम्हा सर्वांची पूर्ण श्रद्धा आहे.

आणि म्हणूनच आम्हा सर्वांची प्रार्थना आहे—

आमच्या शरीर-रथाच्या अंतिम श्वासापर्यंत एकच चिन्तन, एकच प्रार्थना आहे, श्री सद्गुरू साईनाथा या शरीराच्या हाड, मांस, रक्ताच्या अणुरेणूतून तुमचेच पवित्र नाम संकीर्तन-चिंतन-स्मरण सतत घडत राहो, हीच बाबा, तुमच्या चरणी अखंड, अविरत प्रार्थना आहे.

**********

# काया ती निवाली दर्शनमात्रे

येवोनी जन्माशी शिरडी पाहिली।
काया ती निवाली दर्शनमात्रे॥ धृ०॥

मायबाप माझा तूची साईनाथ।
भ्राता भगिनी तात तूची माऊली॥ १॥ काया.

माझें तन मन तुलाची अर्पिले।
धनची वाहिलें तुझ्या चरणी॥ २॥ काया.

नयनी देखिलें तुझेची स्वरूप।
दारिद्र दैन्य पाप भयची संपली॥ ३॥ काया.

तुझें गुण गाता हरे भव चिंता।
अनिलाचा माथा साईलिलेसही॥ ४॥ काया.

— श्री. अनिल बा. आजगांवकर
४५ गंगाबाई मॅन्शन, गोविंदजी केणी पथ, परळ भोईवाडा.

## श्री साईचरणी विलीन झालेले

# श्री समर्थ सद्‌गुरु चिले महाराज

— श्री. बाळासाहेब शांताराम नाडकर्णी
सी/१४११, लक्ष्मीपुरी,
कोल्हापूर.

श्री दत्तावतारात गणले गेलेले श्री सद्‌गुरु चिले महाराज हे दि. ७ मे १९८६ रोजी निजानंदात निमग्न झाले. कोल्हापूर-करवीर क्षेत्रातील एक महान विभूति दृष्टीआड झाली. प्रथम प्रथम ते खुळा; वेडा म्हणून समजले गेले होते. पुष्कळांनी त्यांच्यावर दगडफेक केली होती. त्यापैकी एका महाभागाचे तर महाराजांनी एवढे लाड केले होते की तो एक कोल्हापूरातील प्रतिष्ठीत दुकानदारही झाला.

परिचय नसतानाही प्रथम भेटीतच पुष्कळ भक्तांना महाराज त्या भक्तांच्या स्वतःच्या नावांनी '.....या!' म्हणून संबोधित करीत असत. ज्या लोकांनी महाराजांना 'समर्थ' म्हणून ओळखले ते महाराजांचे कायमचे भक्त बनले. ज्या लोकांची श्रद्धा मध्येच



ढासळली. ते किंचित् काळ महाराजांपासून दुरावले. विधानसभेत निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींपासून ते रोजगार करणाऱ्या हमालांपर्यंत महाराजांचे भक्त चारी दिशांना विखुरले आहेत. त्यांना महाराजांनी स्वतःच्या अलौकिक सामर्थ्याची प्रचिती दाखवली आहे. नुसत्या सामान्य लोकांच्याच जीवनात नव्हे तर भविष्यात होणाऱ्या सामाजिक आणि जागतिक घडामोडींचे पूर्व भाकीत जवळ असणाऱ्या प्रिय भक्तजनांना महाराज दाखवून देत असत. कित्येक वेळा त्याकरिता एखाद्या भक्तास पाच पाच सहा सहा तास स्वतःजवळ बसवून त्याच्याकडून भूमितीची प्रमेये किंवा बीजगणित सोडवून घेत. सृष्टीच्या बीजगणिताशी त्यांचा खेळ चाले आणि त्यातच मग उच्च प्रतिचा विनोद-कोट्या करीत असत.

श्री चिले महाराज स्वतः काव्य, भजन करीत असत. ताल सूरात ते म्हणू लागले की, एका ओळीतील शब्दाचा अर्थ आपल्या बुद्धीला कळतो न कळतो तोच पुढील दोन तीन अर्थपूर्ण पंक्ती आलंकृत भाषेत गाऊनही ते मोकळे झालेले असायचे.

श्री चिले महाराज उत्कृष्टपणे इंग्रजी भाषा पण बोलत असत. परदेशातील काही भक्त त्यांच्या दर्शनाला आले होते. ते इंग्लीशमध्ये त्यांच्याशी बोलले. महाराज मात्र त्यावेळी त्यांच्याशी मराठीतच बोलले, त्याचे भाषांतर जवळ असणाऱ्या दुभाषाला करावयास त्यांनी सांगितले.

आरोग्याला विघातक, असे बाटलीभर ॲसिड महाराजांनी पचवून; विष प्राशन करणाऱ्या पार्वती पती-परमेश्वर शंकराप्रमाणे स्वतःचे 'शंकर' हे नाव यथार्थ सिद्ध करून दाखवले होते. एकदा आमचे घरी वचन देऊन सुद्धा महाराज जेवावयास आले नाहीत. त्यामुळे आम्हीपण जेवलो नाही. साडेतीन तासांच्या अवधीनंतर आमच्या मातोश्रींना बसल्या ठिकाणीच किंचित झोपेच्या ग्लानीमध्ये दृष्टांत झाला. भगवान विष्णू बालकृष्ण स्वरूपात एका महासागरातील कमल पुष्पात हास्य वदनी एका पायाचा अंगठा दुसऱ्या हाताने हनुवटी जवळ धरीत आमच्या मातोश्रींना म्हणाले, 'अग तो चिले आला आणि जेऊन पण गेला. आता उठा व तुम्ही पण जेऊन घ्या.' श्री चिले महाराजांचे कल्पनेबाहरचे हे अव्यक्त स्वरूप खुद्द भगवंतांनीच आम्हाला असे दाखवून दिले. महाराज पंचगंगेच्या संगमात प्रयागला आमच्या आईंना घेऊन उभे होते. खाली एक पायरी संथ वहाणारे जल, काठाजवळ एक दोन फूटाच्या मर्यादितच समुद्राच्या लाटेप्रमाणे किंचित वर उसळले व महाराजांच्या चरणा सभोवती काही काळ फिरू लागले. पंचगंगेने त्यांचे चरण प्रक्षाळण केलेला हा विलोभनीय प्रसंग फक्त आमच्या मातोश्रींनीच प्रत्यक्ष पाहिला.

एकदा त्यांचे दर्शनास मी गेलो असता मला म्हणाले, 'शिर्डी दत्ताची पंढरी', 'शिर्डी दत्ताची पंढरी' ह्या पंक्तीचा अर्थ माझ्या पूर्णपणे लक्षात आला. त्यांच्या भक्त मंडळीत मी मागे जाऊन बसलो. 'आपण महाराजांच्या विषयी एक लेख श्रीसाईलीलेसाठी लिहावा', असा माझ्या मनात विचार दृढ होत असतानाच, श्री चिले महाराजांनी पंधरावीस बसलेल्या भक्तांमधून माझ्याकडे पहात, जागेवर बसूनच उजवा हात आशिर्वादात्मक उंचावून अनुमती दिली. श्री चिले महाराज एका भक्ताकडे बघत, दुसऱ्या भक्ताला काहीतरी सांगत, परंतु



ते भाष्य तिसऱ्याच भक्ताच्या संदर्भात असे. प्रश्नापूर्वी ते उत्तर देवून मोकळे होत. कैक वेळी त्यांचे बोल एम.अे.बी.टी. झालेल्या प्रज्ञावंतांनाही उमगत नसत.

अशा ह्या समर्थ सद्गुरु श्री चिले महाराजांची समाधी त्यांच्या रहात्या गावी पैजारवाडी, जि. कोल्हापूर येथे बांधली आहे. १० वर्षांपूर्वी ह्या गावी श्री दत्तमंदिर बांधून एका जिवंत सत्पुरुषाच्या समाधीचा जीर्णोद्धार करण्यात आला. 'ही जिवंत समाधी माझी आहे, 'इथे आपण नृसिंहवाडी करावयाची' असे महाराज उद्गारले होते. आज ह्याच समाधीसमोर आता महाराजांची समाधी बांधली आहे. चिमुकले दिसणारे पैजारवाडी हे खेडे श्री चिले महाराजांच्या पावन पदस्पर्शाने नटलेले उद्याचे महान क्षेत्र होत आहे.

कोल्हापूरचे श्रीकृष्ण सरस्वती महाराज, शिर्डीचे श्री साईबाबा आणि अक्कलकोटचे श्री स्वामी समर्थ महाराज ह्या तिन्ही अवतारी महापुरुषांच्या लीलेची एकत्रीत दर्शन-झलक समर्थ सद्गुरु श्री चिले महाराजांच्याजवळ पहावयास मला माझ्या आयुष्यात परमभाग्याने मिळाली. त्यांचे चरणी कोटी कोटी प्रणाम!

## संभ्रम

काय तुला देऊ
साई काय तुला वाहू
मीपण सरले काही नुरले
तुला वाहण्या भाव फुले घेऊ =१=

पायावरतीं भाव वाहिला
अतां कोठचा देह उरला
तुझे गुण ते गाण्यासाठीं
शब्द कोठचे घेऊं =२=

सारखीच तूं घेशी कसोटी
आणि धावशी तूंच संकटी
अशावेळीं मग कोठे जावे
पाय कुणाचे पाहूं =३=

तुझ्यावाचून जगीं न कोणी
तुज बोलाऊ आर्त स्वरांनी
तूं असतांना अम्हां तारिता
तुलाच धरून राहूं =४=

— श्रीमती श्री शहाणे
लक्ष्मी निवास,
गडकरी पथ, डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१.

# श्री साईनाथांचा शरणार्थी (१६)

लेखक : ब्रह्मीभूत स्वामी साईशरणानंद
अनुवादक : वि. बा. खेर

***(१९१६ साली दिवाळीच्या सुटीत लेखक आश्विन वद्य १ पासून कार्तिक शुद्ध ५ पर्यंत म्हणजे एकवीस दिवस शिरडीत राहिला तेव्हा त्याला आलेले अध्यात्मिक अनुभव या लेखापासून सुरुवात करून ते क्रमशः एकंदर ५-६ लेखात देण्यात येतील.)***

या काळात मी माझी थोरली बहीण मोघीबहेन हिच्याकडे राहून सॉलिसिटरच्या परीक्षेची तयारी करत होतो आणि त्या अभ्यासात येणाऱ्या अडचणींमुळे चिंताग्रस्त असे. आध्यात्मपर विचार जेव्हा अभ्यासात गर्क नसे तेव्हा चालतच. तबियत कमजोर झाली होती. एक दिवशी मुंबईस जाण्यासाठी विलेपार्ले स्टेशनला आगगाडीत बसलो तेव्हा जणू काय माझ्या कंबरेखालच्या भागात गणपतीचे दर्शनाचा भास अत्यंत विचित्र रीतीने झाला. त्याचवेळी ज्या डब्यात मी बसलो होतो त्या डब्यातून एका खिस्ती गृहस्थाला उतरताना पाहून तो साक्षात् येशू खिस्त आहे असे वाटले. या समयास परीक्षेच्या अभ्यासाच्या चिंते व्यतिरिक्त ईश्वर, गुरु आणि स्वतः या विषयी अनेक प्रकारच्या विचारांच्या भोवऱ्यात मी सापडलो असता, एक दिवशी समजले की काकासाहेब दीक्षित आपल्या सौभाग्यवतीसह शिरडीला जाणार आहेत. म्हणून त्यांच्यासह बाबांना फुलांचा हार, फळे व काही दक्षिणा पाठविण्याचा विचार केला. माझ्या मेहुण्यांकडून फूलफळं मागवून मी व माझे मेव्हणे दोघेजन बोरीबंदरला काकासाहेबांना द्यायला गेलो. मनात आध्यात्मिक विचारांचे काहूर उठले असल्यामुळे स्टेशनावर विचार स्फुरला की काकासाहेबांच्या मार्फत हे सर्व पाठविण्याऐवजी मी स्वतः शिरडीला जाऊन बाबांना दिल्यास किती चांगले होईल! बाबांना ते देऊन लगेच माघारी यावे! काकासाहेब व त्यांच्या सौभाग्यवतींजवळ ही गोष्ट काढताच त्यांनी रुकार दिला, व नेसत्या वस्त्रानिशी फूलफळं घेऊन व बहीणीला मेहुण्याबरोबर निरोप पाठवून मी शिरडीला गेलो. त्या रात्री काही खाल्ले नाही कारण तोंडात अरुची उत्पन्न झाली होती. शिरडीतील एकवीस दिवसांचा हा वास माझ्या मते फार महत्त्वाचा आहे कारण या काळात मला अनेक प्रकारचे आध्यात्मिक अनुभव आले. त्यापैकी प्रथम ज्या अनुभवांचा राधाकृष्ण आईशी संबंध आहे त्यांचे वर्णन करून नंतर बाबांनी दिलेले अप्रतिम अमूल्य अतिमहत्त्वाचे अनुभव रेखाटण्याचा प्रयत्न करीन. हे मी १४-५-५९ रोजी म्हणजे बेचाळीस वर्षांनी लिहीत आहे.

शिरडीला पोचल्यावर ओढ्यावर स्नान करून बाबांच्या दर्शनास गेलो. मला हार वगैरे बरोबर नेलेले साहित्य सापडले नाही म्हणून दक्षिणेचे पासष्ट रुपये घेऊन बाबांकडे गेलो व दर्शन घेऊन ते त्यांना दिले. (दुपारच्या) आरतीनंतर बाबा नैवेद्याच्या व्यवस्थेत गुंतले होते म्हणून मी राधाकृष्णआईकडे गेलो व दर्शन घेऊन म्हणालो, "आता मी येथेच राह्यला आलो आहे. सॉलिसिटरच्या परीक्षेचा अभ्यास येथेच करीन." ती म्हणाली, "फारच चांगले. तुझ्यासारखा माणूस येथे राह्यला तर उत्तमच. आता जा. बाबा आपल्या

स्थानावर बसले आहेत, भक्तगण सुद्धा आहे व टरबूज व शक्करटेटीटी वगैरे प्रसादाची वाटणी चालली आहे.'' नंतर रुमालाची झोळी करून मला म्हणाली, ''जा, धुनीसमोर रहा म्हणजे माझा प्रसादाचा वाटा झोळीत टाकतील.'' त्याप्रमाणे मी जाऊन उभा राहिल्यावर बाबांच्या सांगण्यावरून माझ्या झोळीत प्रसाद टाकण्यात आला. तो प्रसाद घेऊन मी राधाकृष्णआईकडे गेलो. तेव्हा ती पूर्वी माझी असलेल्या खोलीच्या ओसरीवर जेवत होती. मला बघून ती म्हणाली, ''तुला सांगितलेलं मी विसरूनच गेले. तू आला आहेस याची आठवण राहिली नाही. चल बस.'' असे म्हणून ती डाळभात जेवत होती, त्यातील थोडा बाजूला काढून मला तिने खाण्यास सांगितले. परंतु त्याच्यात एवढ्या मिरच्या होत्या की मी काही खाऊ शकलो नाही.

जेवून उठल्यावर थोडा बसलो तसे राधाकृष्णआई म्हणाली, ''आता तुला निजायचं आहे का?'' मी 'हो' म्हणताच तिने रामनामाची तिची ओढणी माझ्यावर टाकली, स्वतः झोपण्याऐवजी ती खोलीबाहेर गेली व द्वारकामाईकडे नजर करून म्हणाली, ''वामन्या अजून निजायचं म्हणतो!'' माझे झोप घेणे तिला पसंद नाही असे समजून मी लगेच रामनामाची ओढणी तिथल्या तिथे ठेवून खोलीबाहेर पडलो. रात्री मुक्कामावर आल्यानंतर श्रीमंत बुटी, नार्वेकर, राधाकृष्णआई, इत्यादिंसह मी जेवण्यास बसलो. पूर्वी सांगितलेच आहे की या वेळी अभ्यासाच्या चिंतेमुळे अन्नावरील इच्छा उडाली होती व खावत नसे. शिरडीत पण तसेच झाले असते. परंतु राधाकृष्णआईने एकामागून एक घास मला दिले व त्यांच्या तत्वांची संख्या बोलत गेली. असे एकंदर ४२ घास तिने मला दिले, अशी आठवण आहे. अशा रीतीने अन्नावरची माझी अरुची तिने दूर केली. एवढेच नव्हे तर त्या बरोबर असे पण सांगितले की तत्वांचे कोरडे ज्ञान काय कामाचे! कुठल्या वस्तूत काय तत्व आहे ते जाणण्याची शक्ति आपण मिळवली पाहिजे. उदाहरणार्थ मीठ, भात, डाळ, इत्यादिंत काय तत्व आहेत ते जाणणे आवश्यक आहे.

यानंतर काही दिवसांनी आम्ही सर्व जेवायला बसलो असताना माझ्या पानाजवळ एक केळे ठेवण्यात आले ते मला दोनचार ठिकाणी सडलेले भासले, परंतु दुसऱ्यांना ते चांगले वाटले. शिवाय भाजीच्या एका घासात मला ताजी लेंडी दिसली. भाजीचे बाकीचे घास चांगले आढळले. मी चांगले तेवढे घास घेतले व मलीन घास काढून ठेवला. काय खावे व खाऊ नये किंवा काय खाण्यालायक नाही त्याची जाणीव योगी आपल्या भक्तांना अशा रीतीने करून देतात असा यावरून मला बोध झाला. या सुमारास एकदा बाबांनी चण्याची डाळ, खोबरे, मसाला इत्यादींची चटणी केली व ती मला राधाकृष्णआईने खाण्यास दिली व म्हणाली, ''घे, घे, खा. बाबांच्या हातची चटणी पुन्हा खायला मिळणार नाही.'' चटणी फारच तिखट होती परंतु राधाकृष्णआईच्या आग्रहामुळे मी ती खाल्ली त्यामुळे शरीरात विकार होऊन तो बाहेर पडला. दुसऱ्या दिवशी बाबा म्हणाले, ''जे आपल्या वाट्याचं नसतं ते खाल्लं म्हणजे असंच बद्‌बद् बाहेर पडतं.''

शिरडीतील माझ्या या एकवीस दिवसांच्या मुक्कामात राधाकृष्णआईच्या बिऱ्हाडी किती दिवस निजलो ते त्रेचाळीस वर्षांनी आज (१९-५-१९५९ रोजी) नक्की आठवत नाही

परंतु पहिले पाच सहा दिवस निजलो असावे असे वाटते. मी शिरडीला पोचलो तेव्हा अन्नावरील अरुचीमुळे रात्री स्वस्थ झोप येत नसे. राधाकृष्णआईने तत्वांची संख्या मोजून घास दिल्याने ती अरुची दूर झाली. तसेच पहिल्या दिवशी जरी उशीरापर्यंत निद्रा आली नाही तरी नंतर राधाकृष्णआईच्या श्वेत वस्त्राचा स्पर्श होताच इतके शीतल भासले की मला लगेच झोप लागली. त्रेचाळीस वर्षांच्या अनुभवाने खात्री होते की शीतलता वस्त्रात किंवा वस्त्र परिधान करणाऱ्या व्यक्तीच्या कुठल्या अलौकिक गुणात नसून केवळ वस्त्र परिधान करणाऱ्या विषयी आपल्या मनात जी कोमल भावना असते तिचा तो परिणाम होय. (या संदर्भात पंचदशी पहा). ईशसृष्टी बाधक नसून या सृष्टीवर जो आपण आरोप करतो तेच बाधक आहे. स्त्री एकच असते परंतु तिच्या आईवडिलांना एक प्रकारे भासते. तर तिच्या पतीस दुसऱ्या तऱ्हेने दिसते, आणि तिच्या पुत्रास तिसऱ्याच रूपात भासते. भासमान होणारे सर्व जगत् निर्दोष असूनसुद्धा आपल्या मनोविकाराप्रमाणे ते सुखप्रद किंवा दुःखप्रद भासते (पंचदशी, प्रकरण ४, श्लोक १८ ते २३).

एकदा रात्री झोपेच्या वेळेस श्रीमंत बुटी आले व राधाकृष्णआईला म्हणाले, "अबदुल्ला पठाणाच्या झोपडीस आग लागली आहे." हे ऐकून मी म्हणालो, "मी जातो व बंदोबस्त करतो." असे म्हणून मी लोटा घेऊन बाहेर पडलो. नंतर सारी रात्र बाहेरच काढली. म्हणून राधाकृष्णआईला माझ्यासाठी तिच्या घराचे दार उघडे ठेवायला लागले. ती रात्र मी कशी व कुठे काढली हे सांगण्यापूर्वी नानावल्लीशी माझ्या परिचयासंबंधी काही बोलणे जरूर आहे.

नानावल्लीला शिरडीत प्रथम मी १९१६ साली पाहिले. ते बालोन्मत्त पिशाच्चवृत्तीचे ज्ञानी असतात असे माझ्या वाचनात आले होते. नानावल्ली बहुतकरून पिशाच्चवत् राही. मी एकदा बाबांपाशी धुनीपुढच्या खांबाला टेकून बसलो होतो. तीन चारचा समय असावा. इतक्यात तो बाबांकडे आला. त्याला पाहून खूप लोक जमले. ते सर्व द्वारकामाईच्या पटांगणात त्याची व बाबांची लीला पाहण्यासाठी जमले होते. त्या दिवशी तो जे बोलला ते जणू काय माझ्या मनातील विचारच बोलत आहे असा भास मला होत होता. त्याच्या अनुमोदनार्थ माझ्या हाताची बोटे वरखाली करून मी खुश आहे असे दाखवत होतो. तेव्हा बाबांनी मला 'टिमकी वाजवू नकोस' असे म्हणून माझ्या हाताचा चाळा थांबविला. नंतर थोड्या वेळाने नानावल्ली निघून गेला.

राधाकृष्णआईकडून अबदुल्ला पठाणाच्या झोपडीला लागलेल्या आगीचा बंदोबस्त करण्यासाठी मी लोटा घेऊन बाहेर पडलो. त्या अगोदर हौजमधून लोटा पाण्याने भरून शाळेच्या पाठीमागील भागात शौचाला बसलो तेव्हा आरतीसमयी बाबांचा जयजयकार होई तसा माझ्या अंतरात होत आहे असे वाटले. नंतर अंतरात आदेश झाला, 'आजच्या रात्र हा मंत्र जप.' शौचविधी ओटापून मी अबदुल्लाच्या झोपडीकडे गेलो. त्यावेळी चांदणे होते तरीसुद्धा वाटेत खडेकाटे पायांना टोचत होते. झोपडीकडे जाता जाता मनास समजावत होतो की, वामनराव तर मेला आहे. बाबा जणू काय मला वैतरणी ओलांडण्यास लावत आहेत या भावनेतून ती वृत्ती संभवली. झोपडीत अंधार होता.

मला सारी रात्र जप करण्याचा आदेश होता म्हणून मी झोपडीत प्रवेश केला. एका जागी अंधारात बसून मी जपास सुरुवात केली. थोड्या वेळाने जाणवले की, मी ज्याच्यावर बसलो होतो ती अबदुल्लाची धुनीसारखी जागा होती. मला माझ्या आसनाखालून उष्णतेचा ताप लागू लागला. परंतु मी असे समजत होतो की पापांच्या प्रायश्चित्तासाठी बाबांनी मला रात्री जप करण्याची आज्ञा केली आहे व नकळत मी थोड्या अग्नीवर आसनस्थ झालो आहे. तर आता जे होईल ते होवो पण आपण आसनावरून उठायचे तर नाहीच. या भावनेने मी तेथेच बसून राहिलो. काही वेळाने अग्नी शांत झाला व नंतर पहाट झाली. झोपडीत अंधार असल्यामुळे बाहेर काय चालले आहे त्याची मला जाण नव्हती. इतक्यात नानावल्लीचा आवाज ऐकला, "अरे, आता येथे का बसला आहेस?" पुरुष प्रकृति विषयी सुद्धा त्याने काही उद्‌गार काढले पण मला ते आठवत नाहीत. त्याने सांगितले त्यावरून मी सारी रात अबदुल्लाच्या विझत असलेल्या धुनीवर बसून काढली हे सत्य.

यानंतर १९५७ साली मी चातुर्मास पाळला तेव्हा ब्रह्मसूत्राच्या तिसऱ्या पादाच्या १६ व्या अधिकरणात जो प्रश्न उद्‌भवतो त्याचे उत्तर बाबांनी सिद्धांतांना अनुसरून अनुभव देऊन, त्या रात्री विरजानदीची स्मृती जागृत करून, निश्चितपणे जाण करून दिली की मरणा अगोदरच उपासकास उपास्य वस्तूचा साक्षात्कार झाल्याने पुण्यपापाचा परित्याग होतो. व्रतव्रतादि, जप, पुरश्चरण, प्रायश्चित वगैरे ज्या त्या पापांचा नाश करतात पण पुण्याचा क्षय करत नाहीत.

भगवद्‌गीतेचा २ ऱ्या अध्यायातील ५० वा श्लोक असा आहे :

*बद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ।*
*तस्माद्योगाय युज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ।।*

[अर्थ मोरापंतांची आर्या]

*पापातें धुण्यातें जिताचि बुद्धि-युक्त तो नाशी ।*
*ह्मणडनि योगीं योजीं कर्मीं कौशल्य तोचि योग खरा ।।*

या पुण्याचा नाश ज्ञानानेच, ज्ञानयोगानेच होतो. जे जे करतोस, जे जे खातोस, जे जे होमात देतोस, जे जे दान करतोस, जे जे तप करतोस ते सर्व मला अर्पण केल्याने सर्व कर्मबंधनांपासून तसेच कर्माच्या शुभ अशुभ फळांपासून तू मुक्त होशील, व या प्रकारच्या योगमुक्त संन्यासाने तुझा आत्मा विमुक्त होऊन मला प्राप्त होईल व येऊन मिळेल. माझ्या सर्व शुभाशुभ कर्मांतून या काटेरी मार्गाच्या कष्टातून निभावून मला (बाबांनी) मुक्त करून सोडले.

**श्री साईलीलाचा पुढील अंक**

**श्री साईबाबा पुण्यतिथी विशेषांक १ ऑक्टोबर १९८६ रोजी प्रकाशित होईल.**

# गुरुमहती

— सौ. उषा प्र. अधिकारी
सावित्री भुवन, बंदर रोड,
रत्नागिरी.

कौरव पांडव हे राजकुमार विटीदांडूचा खेळ खेळत होते. ते खेळत असता त्यांची सोन्याची विटी विहिरीत पडली. १०५ राजकुमार फार घाबरले. विटी कोणाला काढता येईना. राजवाड्यात जाऊन हे कसे सांगायचे याचा ते विचार करत आहेत तोच एक तेजस्वी ब्राह्मण तिथे आला. मुलांच्या अस्वस्थतेचे कारण समजताच त्याच्या मुखावर हास्य चमकले. काहीही न बोलता त्याने धनुष्याला बाण जोडला व मंत्र पुटपुटत बाण विहिरीत सोडला आणि काय आश्चर्य! ती सोन्याची विटी घेऊनच तो बाण वर आला. कुमारांना आश्चर्य तर वाटलेच आणि त्या ब्राह्मणाचे सामर्थ्यही कळले. मोठ्या आदराने त्यांनी त्या तरुण गृहस्थाला राजवाड्यात नेऊन भीष्माचार्यांना सगळी हकीगत सांगितली. ती ऐकून त्या तरुण गृहस्थाची मुलांना सर्व विद्या शिकविण्यासाठी नियुक्ती करण्यात आली. हा तरुण गृहस्थ म्हणजेच गुरु द्रोणाचार्य. त्यांनी सर्व कुमारांना शस्त्रास्त्र विद्या शिकवल्या. आपला आवडता शिष्य अर्जुन याचेपेक्षा शस्त्रास्त्र विद्येत कुणीही श्रेष्ठ ठरू नये म्हणून एकलव्यासारख्या धनुर्धराचा उजवा अंगठा कापून देण्यास सांगून ती गुरुदक्षिणा स्विकारली. या गुरुने पांडवांवर फार प्रेम केले पण भारतीय युद्धाची वेळ जवळ येऊन ठेपली तेव्हा गुरुकर्तव्य न करता अन्नाच्या मिंधेपणाने ते दुष्ट कौरवांच्या बाजूस राहिले आणि त्यांनी चक्क पांडवांकडे पाठ फिरवली. यांना कसे सद्गुरु म्हणायचे? या उलट केवळ राज्य मिळविण्यासाठी गुरुवर शस्त्र उगारायला लागणार या कल्पनेने अर्जुन शोकाकुल झाला. सात्त्विक, सदाचरणी, सत्यवादी पांडवांना राज्याचे आकर्षण राहिले नाही.

कृष्ण परमात्मा सांदिपनी ऋषींकडे १२ वर्षे विद्याभ्यासासाठी राहिला. त्यांनी कृष्णाला सर्वतऱ्हेचे शिक्षण दिले. कृष्ण परब्रह्माचे रुपडे आहे हे माहीत असूनही त्यांनी त्याचेकडून लाकडे तोडणे, पाणी भरणे यासारखी हलकी-सलकी कामे करून घेतली. खरा गुरु शिष्या-शिष्यात भेदभाव करत नाही हे त्याचे कारण होते. मात्र जेव्हा दुष्ट कंसाचे सेवक श्रीकृष्णाला पकडायला आले तेव्हा जराही विचलीत न होता, पुत्रप्रेम बाजूला सारून स्वतःचा मुलगा कृष्ण म्हणून त्यांचे स्वाधीन करून खरा गुरु कसा असावा हे कृतीने दाखवून दिले. खरा गुरु कसा असावा तर सांदिपनींसारखा. दुसऱ्याच्या मुलासाठी स्वतःचे एकुलते एक लेकरू डोळ्यादेखत दुष्ट शत्रूच्या हाती देणे ही सोपी गोष्ट नव्हे. पण त्या थोर गुरुने आपल्या प्रिय शिष्यासाठी ती केली. हा खरा गुरु. खरा गुरु पूर्ण ज्ञानी असावा लागतो. त्याला पूर्ण अनुभव असावा लागतो. तो अपरोक्षज्ञानी असावा लागतो. असा जेव्हा असेल तेव्हाच शिष्याला ज्ञान देण्याचा, सर्वतोपरी स्वतः सारखा तयार करण्याचा अधिकार त्याला पोचतो. जो शिष्याकडून कसलीही सेवा करून घेत नाही, उलट स्वतःचा देह झिजवतो, वेळी शिष्यासाठी प्राणही अर्पण करतो तो

सद्गुरु. शिष्याला प्रेमाने वागवणारा, योग्य तो मान देणारा, इतकेच नव्हे तर आपला शिष्यही पूर्णब्रह्म आहे असे मानून त्यावर पुत्रवत प्रेम करणारा तो सद्गुरु. असा सद्गुरु म्हणजे आपले सर्वांचे दैवत असलेले परमप्रिय श्रीबाबा. जेथे परमशांती आहे, विद्वत्तेचा काडीमात्र अभिमान नाही, लहान-थोर, जात-पात, राव-रंक हा भेद नाही, जेथे अभय आहे असे स्थान म्हणजे श्री सद्गुरु साईबाबांचे परमपवित्र, कुसुमकोमल चरण. तिथेच खऱ्या शिष्यांचे, भक्तांचे मन रंगते-रमते. अशा या सद्गुरुसाठी काय करावे? तन, मन, धन तर अर्पण करावेच पण आपले सर्व आयुष्य त्यांच्या सेवेकारणीच लावावे. 'माझी सेवा, माझे भजन करणारा आणि मला अनन्य शरण येणारा भक्त मद्रूप होतो' असे भगवान श्रीकृष्णानी सांगितले आहे. आपल्या श्रीबाबांचे तेच सांगणे आहे. त्यांच्या सांगण्याप्रमाणे जे जे वागले-वागत आहेत त्यांच्याजवळ निरंतर बाबा आहेत — त्यांचे कल्याण करीत आहेत. श्रीबाबांनी दादा केळकरांसारख्या कर्मठ ब्राह्मणाला एकादशीच्या दिवशी सागुती आणायला सांगितली, काकासाहेब दीक्षितांना निरपराध बोकडाचा वध करायला सांगितले ते त्यांची परीक्षा घेण्यासाठीच. स्वतःच्या सहवासात कायम राहिलेल्या या भक्तांची जडणघडण आपण घडवली आहे, त्यात ते किती तयार झालेत हे पहाण्याचा त्यांचा हेतू होता. पण श्रीबाबांनी जे पेरले ते उत्तम उगवले होते. भक्त श्रीबाबांच्या परीक्षेत उत्तीर्ण होत होते अर्थात याचा श्रीबाबांना फार आनंद होत असे. त्यांनी भक्तांसाठी काय केले नाही? कुणाला विषापासून वाचवले, कुणाचा अपमृत्यू टाळला, निसर्गाशीसुद्धा आपल्या अफाट सामर्थ्याने झुंज दिली. भंयकर रोगापासून भक्तांना वाचविले. हे करीत असताना गोड गोड' गोष्टीद्वारे, वित्तापासून दूर करून, मानापमानाच्या कल्पना नष्ट करून शाश्वत सुखाचा मार्ग दाखविला. श्री उपासनी महाराजांसारख्या श्रेष्ठ भक्ताला आपला आध्यात्मिक वारसा दिला तो त्यांची पात्रता ओळखूनच. श्रीबाबांनी अनेकांना घडवले पण त्याचे मोठेपण आपणाकडे कधीच घेतले नाही. उलट मी तुमच्या विष्ठेपोटीचा किडा आहे, तुमचा सहवास मला लाभला हे माझे भाग्य असेच ते म्हणत. किती ही विनम्रता! श्रीबाबांनी स्वतः आपल्या गुरुकडून घेतली. स्वतःच्या गुरुची महती सांगताना ते म्हणतात, ''माझ्या गुरुने माझ्याकडून कसलीही सेवा घेतली नाही. मीच आपण होऊन त्यांची सेवा करी - तेव्हा तहान-भूक विसरत असे. माझे गुरु माझ्यावर प्रेमदृष्टीचा वर्षाव करीत. कासवीच्या दृष्टीने त्यांनी सतत माझ्याकडे पाहिले. जे जे त्यांच्याजवळ होते ते त्यांनी मला भरभरून दिले — मला कोणताही गुरुमंत्र दिला नाही. पण मागितले काय? तर दोन पैसे. ते दोन पैसे म्हणजे 'श्रद्धा आणि सबूरी' ते मी तेव्हाच देऊन टाकले आहेत.''

आपणही श्रीबाबांच्या गुरुने त्यांच्याजवळ मागितलेले दोन पैसे श्रद्धा आणि सबूरी श्रीबाबांना दिले पाहिजेत. श्रीबाबांनी म्हटले आहे की, 'जेथे भक्ति श्रद्धान्वित। तेथे मी नित्य अंकित।' हा साधासुधा मंत्र आणि 'साई-साई' हे नित्यजपाचे नाम. बाकी पूजा-अर्चा, वस्त्र-प्रावरणे काही नकोत - अलंकार नकोत. एक भोळीभाळी शुद्ध भक्ती सीताफळासारखी ही मागणी. ही मागणी पूर्ण करायला भक्तांनी झटले पाहिजे. श्रीबाबांचे

आचरण कसे होते हे समजून घेऊन त्याप्रमाणे आचरण केले की झाले गुरुपूजन. आपल्या सद्गुरुला कसलेही सोपस्कार नको आहेत. कसलाही प्रसंग आला तरी परमपवित्र कोमल चरण सोडणार नाही अशी दृढ भावना धरूया म्हणजेच त्यांचे गुरुपूजन झाले. आपल्या सद्गुरुची महती मनोमन ओळखून ती सच्छंदपणे गाऊया तेच त्यांचे भजन, संकीर्तन होईल. सर्व प्राणिमात्रात, सर्व चराचरात श्रीसाईगुरुराज भरून राहिले आहेत हे मनावर ठसवून सर्वांवर प्रेम करूया मग तो भक्तवत्सल साई सद्गुरु दूर आहे का? तो सदैव आपल्या पाठीशी आहे.

इतर देव सारे मायिक। गुरुचि शाश्वत देव एक
चरणी ठेविता विश्वास देख। रेखेवर मेख मारील तो॥

या उक्तीवर विश्वास ठेऊया — साई सद्गुरुला अनन्यशरण होऊया — प्रेमभावनेने उचंबळून जाऊन प्रार्थूया

*श्रीबाबा मी आलो तुम्हा शरण*
*घालवा माझे हे मी पण*
*वर्षवूनी कृपा घन*
*मोक्ष मजला दावा हो॥*

श्रीसद्गुरु साईनाथ महाराज की जय॥

# साईनाथ माझे गुरु

साईनाथ दत्तगुरु संत साक्षात्।
नांदती भक्त हृदयांत॥धृ० ॥

भजन सतत साईंचे करिती।
कीर्तनी भक्त साईचे रंगती।
नामस्मरणी तल्लीन होती।
राहती साई अशा भक्तांत॥१ ॥ नांदतो ---

देह, मन बुद्धी आणि चित्तात।
साई त्यांच्या सदा असे वसत।
देहरूपी शुद्ध मंदिरात।
आत्मरूपे साईंचे हो राहत॥२ ॥ नांदतो ---

वास केला शिरडीत साईंनी।
परि ते असती विश्वव्यापूनी।
प्रकट दिसती ते भक्ताह्न्मनी।
भजा भजा हो साईनामामृत॥३ ॥

— **डॉ. सुनंदा कुलकर्णी**
१/वसंतबहार, नामदेववाडी समोर,
नौपाडा, ठाणे.